POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१९० ● मुंबई, बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## तांत्रिक प्रगतीसोबतच सुरक्षिततेचे भान ठेवणे ही काळाची गरज

## निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

१० फेब्रुवारी २०२६, 'सुरक्षित इंटरनेट दिवस' (Safer Internet Day) जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात साजरा करण्यात आला. यावेळी तांत्रिक प्रगतीसोबतच सुरक्षिततेचे भान ठेवणे, ही काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने यांनी आज सुरक्षित इंटरनेट दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पर्यावरणतज्ञ विजयकुमार कट्टी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रुपाली भालके, उप जिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) सजेर्राव मस्के-पाटील, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी घनश्याम कुमार मेहता, तहसिलदार सचिन चौधर, आयआरएडी जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक हिमानी शेंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने म्हणाले की, सध्याच्या काळामध्ये इंटरनेट व त्यासंदभार्तील साधने सुरक्षित आहेत का? इंटरनेटचा वापर सुरक्षित आहे का? आपण इंटरनेट वापरतो की इंटरनेट आपल्याला वापरतो, याचा आपण विचार करायला हवा. इंटरनेटचा वापर जबाबदारीने करणे आवश्यक आहे. सुरक्षित इंटरनेट, एआय चा वापर करताना त्याचा कामकाजात फायदा जरी होत असला तरी त्याचा योग्य वापर न केल्यास गैरप्रकार होण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम माणसावर होतो. म्हणून इंटरनेटचा वापर सुरक्षितपणे करायला पाहिजे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आयआरएडी जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक हिमानी शेंडे यांनी सादरीकरणाद्वारे सुरक्षित इंटरनेट वापरसंबंधीची माहिती दिली. दरवर्षी, फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी जगभरात सुरक्षित इंटरनेट दिन साजरा केला जातो, विशेषतः मुले, महिला आणि तरुणांमध्ये इंटरनेटच्या सुरक्षित आणि जबाबदार वापराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी यावर्षी, सुरक्षित इंटरनेट दिन १० फेब्रुवारी २०२६ रोजी "स्मार्ट टेक, सुरक्षित निवडी - एआयचा सुरक्षित आणि जबाबदार वापर एक्सप्लोर करणे" या थीम अंतर्गत साजरा केला जाईल.

त्या पुढे म्हणाल्या की, या वर्षीची थीम, "स्मार्ट टेक, सुरक्षित निवडी - अकचा सुरक्षित आणि जबाबदार वापर", सध्याच्या काळात खूपच समर्पक आहे. सर्वसामान्यांसाठी काही महत्त्वाचे 'सायबर सुरक्षा मंत्र' खालीलप्रमाणे आहेत.

**सुरक्षित इंटरनेटसाठी महत्त्वाच्या टिप्स :**

- अक चा जबाबदार वापरः कोणत्याही अक टूलवर आपली वैयक्तिक किंवा गोपनीय माहिती शेअर करू नका. अकने दिलेली माहिती नेहमी पडताळून पहा.
- सायबर स्वच्छता (Cyber Hygiene): तुमचे सर्व पासवर्ड वेळोवेळी बदला आणि ते 'Strong' (अक्षरे, अंक आणि चिन्हांचे मिश्रण) ठेवा.
- टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन (2FA): तुमचे सोशल मीडिया आणि बँक खाती सुरक्षित ठेवण्यासाठी 'Double Layer' सुरक्षा फिचर नेहमी चालू ठेवा.
- शंकास्पद लिंक टाळाः अनोळखी व्यक्तींकडून आलेले ई-मेल, मेसेज किंवा व्हॉट्सअॅपवरील संशयास्पद लिंकवर क्लिक करू नका.
- अल्पवयीन मुलांचे संरक्षणः मुले इंटरनेटवर काय पाहत आहेत आणि कोणाशी संवाद साधत आहेत, यावर पालकांनी लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

**उपयुक्त संसाधनेः**

जर कोणाची सायबर फसवणूक झाली असेल, तर त्वरित खालील माध्यमांचा वापर कराः

- हेल्पलाईन नंबरः १९३०
- वेबसाइटः www.cybercrime.gov.in

प्रमुख पाहुणे विजयकुमार कट्टी यांनी एआय आणि विविध संदर्भ यांचा वापर करुन जेमिनी ई-बुकचा वापर करुन सुरक्षित इंटरनेट संदर्भात माहिती दिली. भारतातील ग्रामीण भागांसह देशाच्या सर्व भागात इंटरनेट वापरकर्त्यांच्या संख्येत झपाट्याने वाढ झाली आहे आणि तांत्रिक प्रगतीमुळे ई-सेवा आणि डिजिटल पेमेंट सक्षम झाले आहेत. परंतु सायबर धोके देखील मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. याव्यतिरिक्त, दैनंदिन जीवनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वाढत आहे, जो आपण कसे संवाद साधतो, काम करतो, शिकतो आणि निर्णय घेतो, यावर परिणाम करतो.इंटरनेट आणि इतर गोष्टींचा सुरक्षित आणि जबाबदार वापर आणि सायबर स्वच्छतेच्या प्रासंगिकतेबद्दल तळागाळातील लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, हे एक प्रमुख लक्ष केंद्रित क्षेत्र आहे.

या निमित्ताने, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय १० फेब्रुवारी २०२६ रोजी देशव्यापी जागरूकता मोहीम आयोजित करत आहे. माहिती सुरक्षा शिक्षण आणि जागरूकता प्रकल्पांतर्गत आयोजित केलेल्या या उपक्रमाचा उद्देश विविध इंटरनेट वापरकर्त्यांना सुरक्षित ऑनलाइन पद्धती, सायबर स्वच्छता, प्रमुख सायबर धोके आणि प्रभावी शमन धोरणांबद्दल शिक्षित करणे आहे, तसेच नागरिकांमध्ये इंटरनेट आणि अक चा जबाबदार वापर वाढवणे आहे.



## महाराष्ट्राच्या राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले 'हे' महत्वाचे निर्णय

■मुंबई। प्रतिनिधी,

- नाबार्डकडून जलसंपदा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पंधरा हजार कोटींचे दीर्घ मुदतीचे कर्ज. यातून ५७ अपूर्ण सिंचन प्रकल्प व १९३ पूर्ण प्रकल्पांच्या वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्यात येणार. राज्यातील ८ लाख हेक्टर कृषि क्षेत्राला सिंचन सुविधा निर्माण होण्याने राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार. (जलसंपदा विभाग)
- कोल्हापूर जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम होणार. मौजे विकासवाडी ( ता. करवीर) १२ हेक्टर ७६ आर शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यास मंजुरी. कोल्हापुरच्या क्रिडा विकासाला चालना मिळणार. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क)
- पुणे जिल्ह्यातील पुरंदर विमानतळासाठी विशेष हेतू प्राधिकरणाची स्थापना. प्रकल्पाला गती देण्यासाठी, भुसंपादन व अनुषांगिक बाबींसाठी सहा हजार कोटींचे कर्ज. एमआयडीसी, एमएडीसी आणि सिडको यांची सहभागीदारी, त्यांच्याकडे भागीदारीनुसार कर्ज फेडीची जबाबदारी. या कजार्ला शासन मान्यता व हमी देण्यास मान्यता. (उद्योग विभाग)
- राज्यात 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव अभियान' राबविणार. गावपातळीवर आरोग्य सुधारणा घडवून आणण्यावर भर. ग्रामपंचायतीली राज्यस्तरीय पुरस्कारासाठी पाच ते २ कोटी रुपयांचा पुरस्कार. ग्रामपंचाय ते जिल्हापरिषद स्तरापर्यंत पुरस्कार. जीवनशैलीत, आहारात बदल करण्यासाठी प्रोत्साहन, प्रतिबंधात्मक उपाययोजना, वेळेवर उपचार व पुनर्वसन हे अभियानाचे चार स्तंभ. राज्यस्तरापासून उपकेंद्र- ग्रामस्तरापर्यंतचे नियोजन. आर्थिक वर्ष १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ पर्यंत अभियान कालावधी. अभियानाकरिता दरवर्षी ८० कोटी ७५ लाख रुपयांची तरतूद. (सार्वजनिक आरोग्य विभाग)
- पुणे जिल्ह्यातील रत्नपुरी मळा (ता. इंदापूर) येथील एमआयडीसीला जमीन मिळणार. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची रत्नपुरी मळ्यातील एक हजार एकर जमीन नविन औद्योगिक वसाहतीसाठी एमआयडीसीला हस्तांतरीत होणार. उद्योजकांसाठी दिलासा, गुंतवणूक व रोजगार संधी निर्माण होणार (महसूल विभाग)
- मुंबईत मौजे कोलेकल्याण (ता. अंधेरी) येथे महाटेनिस फाऊंडेशनच्या माध्यमातून पायाभूत सुविधा. टेनिस खेळाला प्रोत्साहन, खेळाडुंना सुविधा निर्माण होणार. यासाठी म्हाडाच्या भुखंडांवर माध्यमातून संयुक्त भागीदारी तत्वावर विकास योजना राबविण्यास मंजुरी. (गृहनिर्माण विभाग)
- अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू (मुंबई पारबंदर प्रकल्प) प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्राकरीता नियुक्त नव नगर विकास प्राधिकरण क्षेत्रात तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत भविष्यात राबविण्यात येणाऱ्या विकास प्रकल्पासाठी भूसंपादन व भूवाटपाच्या धोरणास मान्यता. तिसरी मुंबईच्या दिशेने वाटचालीस गती मिळणार. (नगर विकास)
- राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातील बक्षिसांच्या रकमेत वाढ. विद्यार्थी, शिक्षक, प्रयोगशाळा परिचर यांना मिळणार वाढीव बक्षीस. (शालेय शिक्षण)
- महाराष्ट्र सार्वजनिक - खासगी भागीदारी (पीपीपी) धोरण झ्र २०२६ जाहीर. वित्तीय मुल्य २५ कोटीहून अधिक असेल, अशा सार्वजनिक - खासगी भागीदारी प्रकल्पांना मंजूरी देण्याचे अधिकार मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीला. नियोजन विभागात यासाठी स्वतंत्र कार्यासन निर्मितीस मान्यता ( नियोजन विभाग)
- ईलेक्ट्रॉनिक माध्यमातून ई-मेलद्वारे बजावण्यात आलेली नोटीसही कायदेशीर. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम २३०- (नोटीस बजाविणेची रित) मध्ये इलेक्ट्रानिक मेलव्दारे नोटीस बजाविण्याच्या नियमात दुरूस्ती. (महसूल विभाग)
- परभणी जिल्ह्यातील इंद्राणी सहकारी सूतगिरणीला (ता. मानवत) शासन अर्थसहाय्य मिळणार (वस्त्रोद्योग विभाग)
- राज्यात अपर जिल्हाधिकारी यांच्या ११ पदांच्या निर्मितीस मान्यता. जिल्ह्यांचे भौगिलिक क्षेत्र, वाढलेली लोकसंख्या व अंतर विचारात घेता विविध सेवा जलद मिळाव्यात यासाठी उच्च स्तरीय समितीच्या शिफारशीनुसार पद निर्मिती. ( महसूल व वन विभाग)
- नागपूर जिल्ह्यातील मौजा लिंगा (ता. कळमेश्वर) येथे कोल टू केमिकल प्रकल्पासाठी ११७ हेक्टर १९ आर जमीन एमआयडीसीला उपलब्ध करून देणार. (महसूल विभाग)
- बारामती जिल्हा क्रीडा संकुल अंतर्गत मौजे कटफळ येथील क्रीडा सुविधांसाठी ७५ कोटी १३ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास मान्यता. यातून ८० हजार चौरस मीटरवर पॅव्हेलियन, जलतरण तलाव, स्केटिंग रिंग, आर्चरी रेंज, बास्केटबॉल मैदान अशा सुविधा उभारण्यात येणार (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग)
- सुधारित धान्य वितरण प्रणालीत अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करण्यासाठी वाहतूक कंत्राटे निश्चितीसाठी एकाच वेळी निविदा प्रक्रीया राबविण्यास मान्यता. यामुळे मुंबई झ्र ठाणे शिधावाटप क्षेत्रातील ५ परिमंडळे व ३४ जिल्ह्यांमधील वितरण प्रणाली सक्षम होणार, यात सुसूत्रता येणार ( अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग)
- अकोला जिल्ह्यातील पिंपळशेंडा (ता. मुर्तिजापूर) येथील लघू पाटबंधारे प्रकल्पाच्या ६ कोटी ६० लाख रुपयांच्या दुरूस्ती अंदाजपत्रकास मंजुरी. यामुळे २५५ हेक्टरला सिंचन उपलब्ध होणार ( मृद व जलसंधारण विभाग)
- महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेशास मंजुरी (वित्त विभाग)
- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील १०९ (३) (घ) मध्ये सुधारणेस मान्यता. (उच्च व तंत्र शिक्षण)
- महाराष्ट्र विनाअनुदानित खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ मध्ये सुधारणा करण्यास, त्याबाबतच्या अध्यादेशास मान्यता. ( उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

## वेगाने घेतला २७ वर्षीय भारतीय नेमबाजाचा जीव, मुंबई-अहमदाबाद महामार्गावर भीषण अपघात

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईशी जोडलेल्या महामार्गांच्या रस्ते अपघातांमध्ये घट होताना दिसत नाही आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये मुंबई झ्र अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात झाल्याचे समोर आले आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, २०२५ च्या जानेवारी ते जून महिन्यांमध्ये तब्बल ५० भीषण अपघात झाले, ज्यामध्ये ३० हून अधिक लोकांना आपले प्राण गमवावे लागले.

याच महामार्गावर सोमवारी (९ फेब्रुवारी) झालेल्या एका भीषण अपघातात २७ वर्षीय भारतीय नेमबाज संभाजी पाटील याचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. यामुळे संपूर्ण राज्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.





**छत्रपती संभाजीनगरात शोककळा**

संभाजी पाटील हा बालेवाडी क्रीडा संकुलात क्रीडा अधिकारी म्हणून कार्यरत होता. अपघातानंतर त्याचे शवविच्छेदन करून नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. मनोर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, त्याच्या पार्थिवावर छत्रपती संभाजीनगर येथील त्याच्या मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्याच्या अकाली निधनाने छत्रपती संभाजीनगरमध्ये शोककळा पसरली आहे.

पुण्याहून गुजरातच्या दिशेने जात असताना मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील पालघर येथील दुर्वेस गावाच्या हद्दीत झालेल्या भीषण अपघातात नेमबाज संभाजी पाटील याचा जागीच मृत्यू झाला. सोमवारी (९ फेब्रुवारी) सकाळी १० वाजताच्या सुमारास त्यांचा मित्र प्रणय चौधरीने आपली भरधाव गाडी दुसऱ्या मार्गिकेतून पहिल्या मार्गिकेत घेताना समोरच्या ट्रकचा अंदाज चुकला. यामुळे त्यांची गाडी आणि ट्रकची जोरदार धडक झाली. या दुर्घटनेत संभाजी पाटील याचा जागीच मृत्यू झाला असून गाडी चालवणारा त्याचा मित्र प्रणय चौधरी हा गंभीर जखमी झाला आहे.

या घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस आणि मनोर पोलीस घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी संभाजी पाटील याला रुग्णालयात घेऊन गेले असता त्याला मृत घोषित करण्यात आले. हा अपघात एवढा भीषण होता की, गाडीचे बोनेटचा आणि इंजिनच्या भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला होता. अपघातास्थळी फक्त गाडीचा मागचा भाग आणि चाकच शिल्लक राहिल्याचे दिसून आले.

## अवैध दारू वाहतूक प्रकरणी २६.२८ लाखांचा मुद्देमाल जप्त



■पालघर। प्रतिनिधी,

तलासरी पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैधरीत्या दारूची वाहतूक करणाया आरोपीवर मोठी कारवाई करत तब्बल २६,२८,३२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ५ फेब्रुवारी २०२६ रोजी तलासरी पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, मुंबई-अहमदाबाद महामार्गावरून मुंबईच्या दिशेने जाणारा टाटा टेम्पो अवैध दारू वाहतूक करत असून सदर वाहन हिमाचल-पंजाब ढाबा, तलासरी येथे रस्त्याच्या कडेला थांबले आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे तलासरी पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जाऊन वाहनाची तपासणी केली. वाहनचालकाने आपले नाव शिवेंद्रकुमार लालबाबु ठाकुर (वय ४१ वर्षे, व्यवसाय-चालक) असे सांगितले. वाहनामध्ये औषध कंपनीची औषधे असल्याचे सांगून बिल दाखविण्यात आले. मात्र सखोल तपासणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेली अवैध दारू आढळून आली.

तपासणीदरम्यान ९,२८,३२० रुपये किमतीची अवैध दारू तसेच वाहनासह एकूण २६,२८,३२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी तलासरी पोलीस ठाण्यात गु.र.नं. 30/२०२६, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(अ) (ई) अन्वये ६ फेब्रुवारी २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जयराम उमतोल करीत आहेत. ही कारवाई पालघर पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, उपविभागीय पोलीस अधिकारी विकास नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अजय गोरड, पोउपनिरीक्षक जयराम उमतोल, रामचंद्र गवळी, महेश बोरसा, वांगड, शेवाळे व मुढे (तलासरी पोलीस ठाणे) यांच्या संयुक्त पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## 'त्या' कोंडीला जबाबदार टँकर चालकावर गुन्हा

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील ३३ तासांच्या वाहतूक कोंडीला जबाबदार असलेल्या टँकर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निष्काळजीपणे आणि धोकादायकपणे वाहन चालवणे, इतरांचे जीवन तसेच वैयक्तिक सुरक्षितता धोक्यात आणणे या आरोपांखाली उत्तर प्रदेशातील आझमगढ येथील रहिवासी रतन सिंग उदय नारायण सिंग (४४) याच्याविरुद्ध खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ज्वलनशील प्रोपीलीन वायू घेऊन जाणारा हा टँकर ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५



वाजण्याच्या सुमारास आदोशी बोगद्याजवळ उलटला होता. उतारावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्यानंतर भरधाव टँकर उलटला. हा टँकर कोचीनहून गुजरातकडे जात होता.

या घटनेत चालक आणि त्याचा मदतनीस जखमी झाले असून त्यांना नवी मुंबईतील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातानंतर ३३ तासांनी ५ फेब्रुवारी रोजी पहाटे द्रुतगती मार्गाच्या मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावरील वाहतूक पूर्ववत करण्यात आली होती.

## मुंबईत भर दिवसा गोळीबाराचा थरार, १९ वर्षीय तरुणीचा मृत्यू

**तरुणीवर गोळी कुणी झाडली? मोठी माहिती समोर**

मृतक तरुणीवर त्याच परिसरात राहणाऱ्या एका महिलेने गोळी झाडून ठार केल्याची माहिती आहे. ही तरुणी आपल्या पतीसोबत जवळीक करीत असल्याचा महिलेला संशय होता. त्यातून दोन दिवसांपूर्वी दोघींमध्ये जोरदार भांडण झाले होते. त्याचाच राग काढण्यासाठी हे कृत्य केल्याचे म्हटले जात आहे. गोळीबार करणारी महिला फरार असून पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असल्याची माहिती आहे. आरोपी महिलेकडे गोळीबार करण्यासाठी पिस्तूल कुठून मिळाली? हा देखील प्रश्न महत्त्वाचा आहे. त्यामागचं कारण पोलीस शोधून काढतात का? ते पाहणं महत्त्वाचं आहे. दरम्यान, गोळी लागल्यानंतर तरुणी बरेच अंतर चालून गेल्याने नेमकं घटनास्थळ संध्याकाळपर्यंत पोलिसांना कळत नव्हतं. पोलीस आता या प्रकरणी सखोल तपास करत आहेत.

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्राची राजधानी आज गोळीबाराच्या घटनेने हादरली आहे. मुंबईत गोवंडी येथे शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत भर दिवसा गोळीबाराची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेत एका १९ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला आहे. गोळीबाराच्या घटनेनंतर हल्ला करणारी व्यक्ती पळून गेली आहे. तर दुसरीकडे घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी या घटनेचा तातडीने तपास सुरु केला आहे. पोलिसांनी या प्रकरणी दोन संशयितांना ताब्यात घेतल्याची देखील माहिती समोर येत आहे. मुंबई सारख्या मोठ्या शहरात अशा प्रकारची गोळीबाराची घटना घडल्याने अनेकांकडून आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. पण मुंबईत गोळीबाराच्या घटना सातत्याने समोर येत आहे.

नुकतंच काही दिवसांपूर्वी बॉलिवूड दिग्दर्शक रोहित शेट्टी याच्या घराबाहेर गोळीबार झाला होता. अभिनेता सलमान खानच्या घराबाहेर गोळीबाराची घटना याआधी घडली आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाबा सिद्दीकी यांचीदेखील गोळीबार करुन हत्या करण्यात आल्याची घटना समोर आली होती. पण आज शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत झालेली घटना ही वेगळी असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईत शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत मंगळवारी दुपारी बारा वाजेच्या सुमारास तरुणीवर गोळीबार करण्यात आला. पूर्ववैमनस्यातून ही गोळीबाराची घटना घडल्याची माहिती प्राथमिक तपासातून समोर येत आहे. वैयक्तिक वादातून ही घटना झाल्याची प्राथमिक माहिती आहे. पोलीस या घटनेचा सविस्तर तपास करत आहेत. या घटनेची सध्या परिसरातील नागरिकांमध्ये चांगलीच चर्चा सुरु आहे.




संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# देशात 'बुरखा बंदी' करा!



मुंबईतील लोकलमध्ये एका मुसलमान पुरुषाने बुरखा घालून महिलांच्या डब्यात घुसखोरी केल्याच्या घटनेनंतर मुंबईकरांच्या सुरक्षेचे सूत्र पुन्हा ऐरणीवर आले आहे. महिलांनी प्रसंगावधान दाखवून त्याला विरोध केला आणि खाली उतरवले, हे कौतुकास्पद आहे; मात्र हा पुरुष पुन्हा दुसऱ्या गाडीत चढला, ही गोष्ट रेल्वे प्रशासन आणि पोलीस यांच्या कार्यक्षमतेविषयी प्रश्नचिन्ह उभे करते. जर तो एखादा आतंकवादी असता किंवा त्याच्याकडे स्फोटके असती, तर होणाऱ्या भीषण अनर्थाला उत्तरदायी कोण? बुरख्यामुळे व्यक्तीची ओळख पटवणे अशक्य होते. आजच्या 'सीसीटीव्ही'च्या युगातही जर चेहराच झाकलेला असेल, तर गुन्हेगाराचा माग काढणे कठीण जाते. यामुळेच गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक, चोर आणि समाजकंटक बुरख्याचा आधार घेऊन स्वतःची ओळख लपवत आहेत. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी बुरखा बंदीचा विचार कुणी मांडला, तर ते चुकीचे ठरणार नाही. बुरखा बंदीची मागणी धार्मिक द्वेष नसून ती पूर्णतः राष्ट्रीय सुरक्षेच्या सूत्रावर आधारित आहे. जगातील अनेक पुरोगामी आणि विकसित देशांनी हा धोका ओळखून कठोर पावले उचलली आहेत. फ्रान्स वर्ष २०११ मध्येच सार्वजनिक ठिकाणी चेहरा झाकण्यावर बंदी घालणारा पहिला युरोपीय देश ठरला. 'धर्मनिरपेक्षता' आणि 'सार्वजनिक सुरक्षा' ही त्यामागील मुख्य कारणे होती. त्यानंतर युरोपमधील अन्य देशांनीही अशाच प्रकारचा कायदा केला. स्वित्झर्लंडमध्ये तर वर्ष २०२१ मध्ये एका सार्वमताद्वारे जनतेने सार्वजनिक ठिकाणी बुरखा, हिजाब आणि नकाब घालण्यावर बंदी आणण्याच्या बाजूने कौल दिला. बेल्जियम, डेन्मार्क, ऑस्ट्रिया आणि बल्गेरिया या अन्य युरोपीय देशांनीही बुरख्यावर बंदी घातली. या देशांमध्ये कुणी सार्वजनिक ठिकाणी बुरखा, नकाब, हिजाब घातला, तर त्यांच्याकडून दंड वसूल केला जातो. या देशांनी अनुचित घटना घडण्यापूर्वीच निर्णय घेतला, तर श्रीलंकेने वर्ष २०१९ मधील भीषण साखळी बॉंबस्फोटांनंतर सुरक्षेच्या कारणास्तव सार्वजनिक ठिकाणी चेहरा झाकण्यावर बंदी घातली. अफगाणिस्तान आणि पाकिस्तान या इस्लामी देशांमध्ये अनेकदा पुरुष आतंकवाद्यांनी बुरखा घालून सुरक्षा चौक्यांवर आत्मघाती आक्रमणे केली आहेत. भारतातही काश्मीरमध्ये सुरक्षादलांना गुंगारा देण्यासाठी आतंकवाद्यांनी अनेकदा बुरख्याचा आधार घेतला आहे. बुरख्याच्या आत मोठ्या प्रमाणात शस्त्रे, हातबॉंब आणि 'स्फोटक जॅकेट' लपवणे सोपे जाते. भारतात अनेक शहरांमध्ये मुले पळवणाऱ्या टोळ्यांमधील महिला किंवा पुरुष बुरखा घालून फिरत असल्याचे सीसीटीव्ही चित्रीकरण समोर आले आहे. बुरखा घातल्यामुळे संशय येत नाही आणि गर्दीत पळून जाणे सोपे होते. सराफ बाजारात, दुकानात किंवा बँकांमध्ये बुरखा घालून येणाऱ्या व्यक्तींकडून लूटमार झाल्याच्या घटना घडल्या आहेत. याचे अनेक व्हिडिओही समोर आले आहेत. मॉलसारख्या व्यापारी संकुलात साहित्य बुरख्याआड लपवून चोऱ्या करण्याच्या असंख्य घटना भारतात आणि विदेशातही समोर आल्या आहेत. चेहरा झाकलेला असल्यामुळे पोलीस गुन्हेगारांचे रेखाचित्रही बनवू शकत नाहीत. भारतात 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया'सारख्या बंदी घातलेल्या जिहादी संघटनांनी हिजाब आणि बुरखा यांचा वापर करून देशात अराजकता माजवण्याचा प्रयत्न केला. कर्नाटकामध्ये शाळेतील हिजाब प्रकरणाच्या वेळी ज्या प्रकारे कट्टरतावाद्यांनी चिथावणी दिली, त्यावरून हे स्पष्ट होते की, हा केवळ वस्त्राचा विषय नसून तो 'शरीयत' लागू करण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. त्यामुळे 'धर्म' घरात ठेवावा; मात्र सार्वजनिक ठिकाणी 'राष्ट्र' आणि 'सुरक्षा' हेच सर्वोच्च असले पाहिजेत, असे ठणकावून सांगण्याची आवश्यकता आहे. केंद्र आणि राज्य सरकारे यांनी वेळ न घालवता सार्वजनिक सुरक्षेसाठी चेहरा उघड ठेवण्याच्या नियमावलीचा विचार करणे, ही काळाची आवश्यकता आहे. बुरख्याचे समर्थन करतांना 'धार्मिक स्वातंत्र्य' हा शब्द वापरला जातो; पण प्रत्यक्षात हा महिलांच्या मानवाधिकारांचा संकोच आहे का?, याचा विचार व्हायला हवा. इराणमध्ये महसा अमिनी या तरुणीला हिजाब नीट न घातल्यामुळे अटक करून पोलीस कोठडीत तिच्यावर अत्याचार झाल्याने तिचा मृत्यू झाला. त्यानंतर संपूर्ण जगाने पाहिले की, तेथील महिलांनी बुरखा आणि हिजाब जाळून स्वतःच्या स्वातंत्र्याची मागणी केली. हे स्पष्ट करते की, बुरखा हा अनेकदा स्वेच्छेने नसून दबावापोटी स्वीकारलेला असतो. सतत बुरख्यात राहिल्यामुळे महिलांना सूर्यप्रकाश मिळत नाही, ज्यामुळे हाडांचे विकार उद्भवतात. तसेच, चेहरा झाकलेला असणे हे मानसिकदृष्ट्या व्यक्तीला समाजापासून विलग करते. भारतासारख्या लोकशाही देशात जेव्हा अशा बंदीची चर्चा होते, तेव्हा त्याला 'धार्मिक स्वातंत्र्या'चे सूत्र बनवून विरोध केला जातो; मात्र 'धर्मस्वातंत्र्यापेक्षा राष्ट्रहित आणि सार्वजनिक सुरक्षा नेहमीच श्रेष्ठ असते', हे तत्त्व आपण विसरता कामा नये. भारतीय राज्यघटनेनुसार अनुच्छेद २५ अंतर्गत धार्मिक स्वातंत्र्य आहे; परंतु त्यावर 'सार्वजनिक सुव्यवस्था' आणि 'आरोग्य' यांनुसार निर्बंध घालता येतात. देशात सर्वांसाठी समान कायदा आल्यास अशा प्रकारच्या विशिष्ट सवलती किंवा धार्मिक आच्छादनाखाली लपवल्या जार्णाया गोष्टी यांना आळा बसेल. जर मुंबईतील लोकलमध्ये अशा घटना वारंवार घडत नसल्या, तरी देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने रेल्वेस्थानके, विमानतळ आणि गर्दीच्या ठिकाणी चेहरा उघडा ठेवणे अनिवार्य करण्याची वेळ आली आहे. भारतात मुसलमानांच्या लांगूलचालनाच्या राजकारणामुळे अशा संवेदनशील विषयावर कठोर निर्णय घेण्यास टाळाटाळ केली जाणार, यात शंकाच नाही. देशातील कोणताही राजकीय पक्ष अशा प्रकारची मागणी करतांना कधीही दिसत नाही. वास्तविक प्रत्येकाला बुरख्यामुळे समाजाच्या सुरक्षेच्या संदर्भात होणारे तोटे ठाऊक आहेत; मात्र केवळ राजकीय स्वार्थामुळे देशहित मागे टाकले जात आहे. यासाठी जनतेनेच बुरखा बंदीची मागणी लावून धरणे आवश्यक झाले आहे. त्यासाठी हिंदु संघटनांनीही दबाव निर्माण केला पाहिजे. मुंबईत आतापर्यंत अनेक जिहादी आतंकवादी आक्रमणे झाली आहेत. 'लव्ह जिहाद'च्या घटना वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर पुन्हा काहीतरी मोठे होण्याची वाट पहाण्यापूर्वीच बुरखा बंदी घालण्यासाठी मागणी करणे आवश्यक झाले आहे.


# राज्यात भाजपच सिकंदर आणि भाजपच धुरंधर



लोकसभा, विधानसभा निवडणुकांनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या. सगळीकडे भाजपचाच प्रभाव दिसत आहे. १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीत भाजपने पुन्हा एकदा त्यांची ताकद दाखवून दिली आहे. १२ जिल्हा परिषदांमधील एकूण ७३१ जागांपैकी भाजपने २२५ हून अधिक आणि महायुतीने ५७० हून अधिक जागा मिळवून भाजपने 'तेच सिकंदर आणि तेच धुरंधर' असल्याचे दाखवून दिले आहे. २०१९ मध्ये १०६ आमदार असलेल्या भाजपचे २०२४ मध्ये १३२ आमदार झाले. यावरून भाजपची ताकद किती वाढली हे दिसून आले. मात्र, भाजप तेवढ्यावरच थांबला नाही तर त्यांनी ग्रामीण भागातदेखील मुळं रुजवली आहेत. त्याचे फळ नगरपरिषदांची निवडणूक, नगर पंचायत आणि पंचायत समितींची निवडणूक, महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुकीत मिळाले आहे. शहरी पक्ष अशी प्रतिमा असलेला भाजप आता ग्रामीण भागात चांगलाच रुजला आहे, वाढला आहे आणि मोठा होत आहे, हे २०१७ पासून झालेल्या सर्व निवडणुकांमध्ये दिसून आले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे भाजपची पक्षांतर्गत रचना. हा पक्ष वर्षभर निवडणुकीत व्यग्र असतो. २०१९ च्या निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर लगेचच त्यांनी २०२४ ची तयारी सुरू केली. त्याचवेळी महापालिका, जिल्हा परिषदा, नगरपरिषदा आणि ग्रामपंचायत स्तरावर तयारी सुरू केली.

इतर राजकीय पक्ष आणि भारतीय जनता पक्षामध्ये हाच मुख्य फरक आहे. प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचायचे, कार्यकर्त्यांची फळी तयार करायची आणि बूथ लेवलची संपूर्ण तयारी यामुळे भाजपची पाळेमुळे महाराष्ट्राच्या गावखेड्यात रुजली आहेत. कधी काळी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंचे बोट धरून महाराष्ट्राच्या राजकारणात उडी घेतलेल्या भाजपची ही कामगिरी थक्क करणारी आहे. शिवसेना मोठा भाऊ आणि भाजप धाकटा भाऊ असे तेव्हा राजकारणातील चित्र होते. मात्र, शिवसेनेला सोबत ठेऊन भाजपने कधी मुसंडी मारली हे शिवसेनेलाही कळले नाही. आणि मी मोठा भाऊ म्हणणारी शिवसेना कधी धाकटा भाऊ बनली, हे त्यांच्या नेत्यांनाही कळले नाही. भाजपने हे सगळे कसे साध्य केले, त्यामागे कोणती शक्ती कामाला लावली, निवडणुकांचे राजकारण कसे खेळले जाते, कोणती यंत्रणा हाताशी धरली याचा आता किती विचार करायचा हा भाग वेगळा. लोकशाहीमध्ये ज्याच्याकडे बहुमत तो सत्ताधीश, हा फॉर्म्युला आहे. त्यामुळे भाजप विजयी झाला आहे आणि सत्तेच्या सर्व चाव्या याच पक्षाच्या आणि त्यांच्या मित्रपक्षांच्या हातात आहेत, हे नाकारता येणार नाही. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीला यश मिळाल्यानंतर विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीने ह्यलाडकी बहीणह्य नावाचे अस्त्र बाहेर काढले. त्याचे फळ त्यांना मिळाले. विधानसभा निवडणुकीत भाजपला तब्बल १३२, शिवसेनेला ५७ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला ४१ म्हणजे एकूण २८८ पैकी २३० जागांवर विजय मिळाला. त्यावेळी लाडकी बहीण म्हणत मतांसाठी १५०० रुपयांची लाच दिल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी वारंवार केला होता.

आजही तसा आरोप केला जात आहे. मात्र, त्याच महाविकास आघाडीने महिलांसाठी ३ हजार रुपये देण्याचा वायदा केला होता, हे ते सोयीस्कर विसरले. तेव्हापासून भाजपची विजय एक्स्प्रेस सुस्साट धावत आहे. गेल्यावर्षी २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुका झाल्या. यात भाजपने १२९ नगरपरिषदा जिंकल्या. त्यांचे ३ हजार सदस्य विजयी झाले. त्यानंतर २९ महापालिकांच्या निवडणुका झाल्या. यात एकट्या भाजपचे १४२५ सदस्य विजयी झाले. शिवाय शिवसेनेचे ३९९ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे १६७ सदस्य धरले तर महायुतीचा दणदणीत विजय झाला आहे. दोन वर्षांपासून प्रत्येक निवडणुकीत पैशांचे अमाप वाटप होत असल्याचे आरोप झाले आहेत. पैसे वाटपाचे व्हिडीओ व्हायरल झाले आहेत, त्यावर निवडणूक आयोगाने कारवाई केली की नाही यावर आता चर्चा होत नाही. मात्र प्रत्येक निवडणुकीत भाजपच्या यशाची कमान चढतच गेली. अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर प्रचारातील जोर संपला होता. मात्र, भाजप कार्यकर्त्यांनी घरोघरी प्रचार थांबवला नाही तर त्यांना आणखी जोर लावला होता. तुलनेत काँग्रेस, ठाकरे गट, शरद पवार गट प्रभावहिन वाटत आहेत. एकीकडे सत्ता मिळत नसल्याने काँग्रेस आकांडतांडव करत आहे तर दुसरीकडे महापालिका निवडणुकीत चंद्रपूरमध्ये यश मिळूनदेखील काँग्रेसचे आमदार विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यात जुंपली आहे. महापालिका निकाल लागून तीन आठवडे उलटलेत आणि काँग्रेसच्या महापालिकेतील दोन नेत्यांमधील भांडण सोडवायला आजही दिल्लीला जावे लागते. म्हणजे एकीकडे भाजप काँग्रेस संपवायला निघालेला आहे आणि काँग्रेस नेते आजही एकमेकांचे पाय ओढण्यातच धन्यता मानत आहेत. म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा परिषदांच्या निकालानंतर दिलेली प्रतिक्रिया खूपच सूचक आहे. विरोधी पक्ष केवळ माध्यमांमध्येच दिसतो. त्यांचे प्रवक्ते सकाळी जे काही बोलतात त्यामुळे आम्हाला निश्चित फायदा होतो. त्यामुळे आम्हाला फार काही करण्याची आवश्यकता भासत नाही. म्हणजेच विरोधी पक्ष निष्क्रिय आहे म्हणून आम्ही जिंकतो, यात आमचेही फारसे कर्तृत्व नाही, हे एकप्रकारे सांगितले आहे. त्यातून कुणी काय बोध घ्यायचा तो घ्यावा, तूर्तास राज्यात भाजपच सिकंदर आणि भाजपच धुरंधर आहे, एवढे मात्र नक्की!



# विनाशी मनोवृत्तीचे डावपेच

माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या प्रकाशित न झालेल्या पुस्तकातील उल्लेखाचा आधार घेऊन युवराज राहुल गांधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर नेहमीप्रमाणे आरोपांच्या फैरी झाडू लागले आहेत. सरकारच्या चुका दाखवणे हे विरोधी नेत्याचे कर्तव्यच असते. मात्र हे कर्तव्य बजावण्याच्या नावाखाली राहुल गांधी देशात अराजक माजवण्याचे डावपेच खेळू लागले असल्याने त्यांना त्याच भाषेत सुनावणे आवश्यक ठरते. त्या पुस्तकातील तपशिलाबाबत बाकी चर्चा बाजूला ठेवूया. पंतप्रधानांनी त्यावेळच्या लष्कराला चीन सैन्याच्या आगळीकीबद्दल निर्णय घेण्याचे अधिकार दिले होते, एवढी एकच परंतु अत्यंत महत्त्वाची बाब युवराजांच्या सुपीक मेंदूत अजून शिरलेली नाही. आपली आई ज्या सरकारची रिमोट कंट्रोल होती त्या मनमोहन सरकारने पाकिस्तानच्या मुंबईवरील २६ नोव्हेंबर २००८ च्या हल्ल्यानंतर पाकिस्तानवर हल्ला करण्याच्या भारतीय हवाई दलाच्या योजनेला नकार दिला होता, त्या नकाराची कारणे आपल्या मातोश्रींना आधी विचारून घेण्याची आणि त्यानंतर आपली अक्कल पाजळण्याची किमान बुद्धी युवराजाकडे नाहीच हे अनेकदा दिसलेच आहे. २००८ चा तो नकार आणि २०२० मधील कारवाई करण्याचे सर्वाधिकार देणारा होकार यातला फरक समजून घेण्याएवढी बुद्धी युवराजकडे नाही. त्यामुळे आपण मोठी शिकार केल्याच्या नादात हे युवराज बेभान होऊन नाचू लागले आहेत. त्यांना काही घटनांची आठवण करून देण्याची गरज आहे.

२६/११ चा हल्ला झाल्यावर आमच्या सरकारने पाकिस्तानवर हल्ला करण्याची तयारी केली होती. मात्र अमेरिकेने दबाव आणल्यामुळे मनमोहन सरकारने माघार घेतली, असे त्यावेळचे केंद्रीय गृहमंत्री चिदंबरम यांनी अलीकडेच एका मुलाखतीत स्पष्टपणे सांगून टाकले आहे. "त्यावेळी मी केंद्रीय गृहमंत्री होतो. पाकिस्तानला खणखणीत उत्तर दिले पाहिजे असे मला वाटत होते. मात्र अमेरिकेने आणलेल्या दबावामुळे आम्हाला पाकिस्तानवरील हल्ल्याचा निर्णय बदलावा लागला," असे चिदंबरम यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितले होते. या मुलाखतीत अमेरिकेच्या त्यावेळच्या परराष्ट्र मंत्री कोंडालिसा राईस कशा भारतात आल्या होत्या, त्यांनी भारताने हल्ला करू नये यासाठी कसे प्रयत्न केले, याची माहितीही चिदंबरम यांनी या मुलाखतीत दिली आहे. मनमोहन सिंग न बोलताही किती श्रेष्ठ, कणखर पंतप्रधान होते, याची गाथा अनेकजण वाचत असतात. डॉ. मनमोहन सिंग विद्वत्तेने मोठे होते यात शंकाच नाही. माणूस म्हणूनही ते मोठे होते. मात्र पाकिस्तानकडून एवढा मोठा हल्ला होऊनही ते गप्प राहिले, याची इतिहासात नोंद कोणत्या अक्षराने होईल याचे उत्तर ज्याच्या त्याच्या बौद्धिक मगदुराप्रमाणे मिळेल. आज शूरवीराचा आव आणणाऱ्या युवराज राहुल यांनी मनमोहन सरकारकडे पाकिस्तानवर हल्ला करण्याचा आग्रह का धरला नाही, याचे उत्तर प्रथम द्यावे. हे उत्तर युवराज देणारच नाहीत.

मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ ला झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर आम्ही सरकारला प्रस्ताव दिला होता. पाकिस्तानवर हल्ल्यासाठी हवाई दल पूर्णपणे सज्ज असल्याचे आम्ही सांगितले होते. पण सरकारने पाकवर हवाई हल्ला करण्याचा प्रस्ताव फेटाळून लावला, असे माजी हवाई दल प्रमुख बी. एस. धनोआ यांनीही जाहीरपणे सांगितले आहे. पाकिस्तानमध्ये दहशतवाद्यांचे छुपे तळ कुठे आहेत याची आमच्याकडे माहिती होती आणि दहशतवाद्यांचे हे तळ उद्ध्वस्त करण्यासाठी हवाई दल सज्ज होते. पण हवाई हल्ला करायचा की नाही? हा निर्णय अखेर राजकीय नेतृत्वाने घ्यायचा असतो, असे धनोआ म्हणाले होते.

मुंबई हल्ल्याच्या एक वर्षानंतर, त्यावेळी भारतीय हवाई दलाचे प्रमुख असलेले फली होमी मेजर यांनी रेडिफ डॉटकॉमला सांगितले की, मनमोहन सिंग सरकारने पाकिस्तानला उत्तर देण्यासाठी "कधीही आपले मन बनवले नव्हते". त्यानंतर मेजर म्हणाले, सरकारने कधीही युद्ध करण्याचा निर्णय घेतला नव्हता. मला माहिती आहे की, संपूर्ण देशाची भावना राग आणि द्वेषाची होती. भारतीय हवाई दल पाकिस्तानवर हल्ला करण्यास सज्ज होते. आमची आकस्मिक तयारी होती आणि आम्ही चांगली तयारी केली होती. पण मनमोहन सरकार गप्प बसले. भारतीय हवाई दलाने मनमोहन सिंग यांना आश्वासन दिले होते की, मुंबई हल्ल्यानंतर शस्त्रे आणि विमानांपर्यंत सर्व काही, पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी छावण्यांवर हल्ला करण्यासाठी लष्कर सज्ज आहे. त्यांनी या अनिर्णयतेचे वर्णन गमावलेली मोठी संधी अशा शब्दांत केले होते. धनोआ, फली मेजर, चिदंबरम यांनी मनमोहन सरकारच्या नाकर्तेपणाबद्दल केलेल्या खुलाशाबद्दल युवराज काहीच बोलणार नाहीत.

त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लोकसभेत काँग्रेसच्या महिला खासदारांकरवी घेराव घालण्याचा प्रयत्न करण्याचे राहुल गांधींचे डावपेच विनाशी मनोवृत्तीचेच होते. लोकसभेत पंतप्रधानांना घेराव घालण्याचा प्रयत्न हा फक्त विरोध नव्हता. त्यामागे अराजकी मेंदू होता. ज्या कोणी महिला खासदार भगिनी हे कृत्य करणार होत्या त्यांना आपण काय करणार आहोत त्याचे गांभीर्य कळाले नव्हते. पक्षाच्या नेतृत्वाचा आदेश पाळण्यासाठी या खासदार लोकसभेत आक्रमक झाल्या होत्या. राहुल गांधींना येनकेन प्रकारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिमा हनन करायचे आहे. त्यासाठीच त्यांनी राफेल विमान खरेदीत भ्रष्टाचार झाल्यासारखे आरोप केले होते. हे आरोप सिद्ध करता न आल्याने युवराजांना सर्वोच्च न्यायालयात चक्क नाक घासून माफी मागावी लागली होती. महिलांची ढाल करून, संसदेत राडा करून त्यातून मोदी सरकारला बदनाम करण्याचे हीन प्रयत्न करण्यापर्यंत युवराजांनी मजल मारली आहे. विरोधालाही मर्यादा असते याचे भान नसलेल्या राहुल गांधींमुळे काँग्रेसची विश्वासार्हता आणखी घसरणीला लागली आहे. बिहार निवडणुकीपूर्वी प्रचंड गाजावाजा करून युवराजांनी मतदार यादीतील चुकांचे निमित्त करून भारतीय जनता पक्ष आणि निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले होते. मात्र मतदारांनी युवराजांचा कांगावा खणखणीतपणे नाकारला.

अग्निवीर योजनेत हुतात्मा झालेल्या युवकांना केंद्र सरकारकडून भरपाई मिळतच नसल्याचा आरोप करून युवराजांनी युवक वर्गात अग्निवीर योजनेबद्दल गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. युवराज आजवर कितीदा धडधडीतपणे खोटे बोलले याची मोठी यादी तयार करता येईल. आपल्या नेतृत्वाला सामान्य मतदार का नाकारत आहेत यामागची कारणे जाणून न घेता समाजातील विविध वर्गांत तेढ निर्माण करणे, भारतीय लष्कराच्या कामगिरीबद्दल संशय निर्माण करणे यासारखे उद्योग युवराजांकडून चालू असतात. हे विनाशी डावपेच पक्षाच्या मुळावरच उठतील यात काही शंका नाही.



# भ्रष्टाचाऱ्यांचा तपास टाळणारी पळवाट नसावी

**सरकारी व्यवस्थेतील भ्रष्टाचार नष्ट व्हावा, यासाठी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा तयार करण्यात आला. भ्रष्टाचाराचे आरोप झाल्यानंतर चौकशी करण्यासाठी वरिष्ठांची पूर्वपरवानगी घ्यावी लागण्याची अट घालणे हे कायद्याच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासण्यासारखे आहे. न्या. नागरत्ना यांनी नेमका यावरच आपल्या निकालपत्रात भर दिला. भ्रष्टाचारात वरिष्ठांपासून कनिष्ठांपर्यंतची साखळीच असते. मी तुला सांभाळून घेतो, तू मला सांभाळून घे, अशी जर व्यवस्था तयार झाली तर भ्रष्टाचार रोखायचा कसा, असा प्रश्न निर्माण होऊ शकतो.**

असे फार कमी वेळा होते की न्यायालयाच्या खंडपीठातील दोन न्यायाधीशांमध्ये निकाल देण्यावरून एकमत होत नाही. त्यामुळे दोन्ही न्यायाधीश स्वतंत्रपणे आपले निकाल देतात. एकमत न झाल्यामुळे संबंधित प्रकरण पुन्हा सरन्यायाधीशांकडे जाते आणि त्यावर नव्या खंडपीठापुढे निकालासाठी सुनावणी घेतली जाते. सर्वोच्च न्यायालयात गेल्याच महिन्यात एका प्रकरणावरून अशी स्थिती निर्माण झाली. हे प्रकरण होते सरकारी अधिकाऱ्यांवर होणाऱ्या भ्रष्टाचाराच्या आरोपांच्या चौकशीचे. या संदर्भात एक जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली होती. 'सेंटर फॉर पब्लिक इंट्रेस्ट लिटिगेशन' यांनी ही याचिका दाखल केली होती. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ मधील कलम १७ ए घटनाबाह्य ठरवून रद्द केले जावे, अशी मागणी करण्यासाठी ही जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. याच याचिकेवर सुनावणी झाल्यानंतर खंडपीठातील दोन न्यायाधीशांमध्ये निकालावरून एकमत झाले नाही आणि दोघांनी आपले स्वतंत्र निकाल दिले. यातील न्या. नागरत्ना यांनी हे कलम घटनाबाह्य ठरविले, तर न्या. के. व्ही. विश्वनाथन यांनी हे कलम घटनाबाह्य नसल्याचे म्हटले आहे. न्या. नागरत्ना यांनी आपल्या निकालपत्रात दिलेले काही मुद्दे हे अत्यंत महत्त्वाचे असून, ते समजून घेतले पाहिजेत.

निकालपत्रातील मुद्द्यांकडे जाण्याआधी मुळात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील कलम '१७ ए' नक्की काय सांगते, ते बघायला हवे. या कलमानुसार, कोणताही सरकारी अधिकारी त्याचे नेमून दिलेले काम करीत असताना किंवा जबाबदारी सांभाळत असताना त्याच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले तर त्याच्या वरिष्ठांच्या पूर्वपरवानगीशिवाय पोलीस त्याची चौकशी करू शकणार नाहीत किंवा त्या प्रकरणाचा तपासही करू शकणार नाहीत. मूळ कायद्यात हे कलम नव्हते. ते २०१८ मध्ये कायद्यात दाखल करण्यात आले. ते दाखल झाल्यापासून त्यावर सजग नागरिकांनी हरकती घेतल्या आहेत. त्यामुळेच त्यावर जनहित याचिका दाखल झाली.

भ्रष्टाचार ही सरकारी व्यवस्थेला लागलेली कीड आहे. ती दूर केल्याशिवाय स्वच्छ कारभार होऊ शकणार नाही. त्यामुळेच हा कायदा आणण्यात आला होता. सरकारी अधिकार्यांना काम करताना वेगवेगळे निर्णय घ्यावे लागतात. अनेकवेळा हे निर्णय घेतल्यावर अधिकार्यांवर आरोप होतात. एका गटाला किंवा कंपनीला फायदा मिळवून देण्यासाठीच हे निर्णय घेतले गेल्याचे म्हटले जाते. अशा स्थितीत सरकारी अधिकारी बर्याच वेळा निर्णय घेण्याचे टाळू लागतात. निर्णय घेऊन आरोप सहन करण्यापेक्षा किंवा चौकशीला सामोरे जाण्यापेक्षा निर्णयच घ्यायला नको, अशी त्यांची अवस्था होते. हे टाळण्यासाठी आणि सरकारी अधिकाऱ्यांना निर्णय घेण्यासाठी आवश्यक बळ मिळावे म्हणूनच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यात कलम १७ ए दाखल केले गेले होते. ही झाली एक बाजू. याची दुसरी बाजू अशी आहे की, अशा पद्धतीने वरिष्ठांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय चौकशी किंवा तपास केला जाऊ शकत नाही, असे म्हणणे म्हणजे एक प्रकारे आरोपींना पाठीशी घालण्यासारखेच आहे. हाच धागा न्या. नागरत्ना यांनी आपल्या निकालपत्रात सविस्तरपणे मांडला.

सरकारी व्यवस्थेतील भ्रष्टाचार नष्ट व्हावा, यासाठी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा तयार करण्यात आला. भ्रष्टाचाराचे आरोप झाल्यानंतर चौकशी करण्यासाठी वरिष्ठांची पूर्वपरवानगी घ्यावी लागण्याची अट घालणे हे कायद्याच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासण्यासारखे आहे. न्या. नागरत्ना यांनी नेमका यावरच आपल्या निकालपत्रात भर दिला. सरकारी व्यवस्थेमध्ये कोणताही निर्णय एकटी व्यक्ती घेत नसते, त्यामध्ये वरिष्ठांपासून कनिष्ठांपर्यंतची साखळीच असते. मग अशा पद्धतीने वरिष्ठांची परवानगी घेणे याला काहीच अर्थ उरत नाही. मी तुला सांभाळून घेतो, तू मला सांभाळून घे, अशी जर व्यवस्था तयार झाली तर भ्रष्टाचार रोखायचा कसा, असा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

सरकारी अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्यानंतर चौकशी करण्यापूर्वी वरिष्ठांची पूर्वपरवानगी घेण्याची तरतूद ही अमर्याद अधिकार देण्यासारखी आहे, त्यासोबतच ते नैसर्गिक न्यायाच्या विरोधात आहे. यामध्ये चौकशीचा निर्णय घेण्याचा वरिष्ठांना जो अधिकार मिळतो, तो पूर्वग्रहरहित असण्याची शक्यता कमीच असते. अशा स्थितीत ते जो निर्णय घेतील तो प्रामाणिकपणे घेतला आहे, हे कसे काय समजणार, असा प्रश्न निर्माण होतो. चौकशी न करण्याचा निर्णय वरिष्ठांनी घेतला, तर मग तपासच होऊ शकत नाही. तपास झालाच नाही, तर भ्रष्टाचार झाला होता की नाही हे कसे काय सिद्ध करायचे, असासुद्धा प्रश्न निर्माण होतो. मुळात कायदा ज्यासाठी निर्माण केला गेला त्याविरोधात हे कलम आहे, याकडे आपल्या निकालपत्रात न्या. नागरत्ना यांनी प्रकर्षाने लक्ष वेधले.

राज्यघटनेतील अनुच्छेद १४ नुसार समानतेचा अधिकार प्रत्येकाला मिळाला आहे. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील कलम १७ ए हे घटनेतील अनुच्छेद १४ च्या तत्त्वाला हरताळ फासणारे आहे. कारण यामध्ये केंद्र आणि राज्य सरकारमधील ठराविकच अधिकार्यांना विशेष सवलत मिळते. त्यांच्या विरोधातील आरोपांची चौकशी करण्यापूर्वी पोलिसांना त्यांच्या वरिष्ठांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक केले जाते. सरकारी उतरंडीमधील सर्वच कर्मचाऱ्यांना अशी सवलत मिळत नाही. याचाच अर्थ एकाला एक वागणूक आणि दुसऱ्याला दुसरी वागणूक दिली जाते, जे घटनेच्या विरोधात आहे. त्यामुळेच न्या. नागरत्ना यांनी हे कलम घटनाविरोधी असल्याचे म्हटले आहे.

हवाला घोटाळ्यानंतर विनीत नारायण विरुद्ध केंद्र सरकार या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली विशेष पोलीस आस्थापना कायद्यातील कलम ६ ए घटनाविरोधी असल्याचे ठरविले होते आणि ते रद्द केले होते. या कलमानुसार, सरकारी खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची कोणतीही चौकशी करण्यापूर्वी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले होते. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील कलम १७ ए हे याच धर्तीवर असून, त्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयाने आधी रद्द केलेले कलम ६ ए परत आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, असे या निकालपत्रात म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने या विषयात आधी दिलेल्या निकालाशी हे कलम विसंगत आहे म्हणूनच ते रद्द करण्याचा निर्णय न्या. नागरत्ना यांनी दिला.

समाजात भौतिक सुखाची वाढत असलेली चढाओढ, संपत्तीचे ओंगळवाणे प्रदर्शन, रुबाब दाखविण्यासाठी केले जाणारे घाणेरडे वर्तन यामागे भ्रष्टाचार हेसुद्धा एक कारण आहे. भ्रष्टाचारातून अनैतिक पद्धतीने पैसा कमाविणे आणि त्याचे ओंगळवाणे प्रदर्शन करणे हे दोन्हीही देशात मोठ्या प्रमाणात सुरू आहे. या स्थितीत आरोप झाल्यानंतर चौकशी करण्यासाठी पूर्वपरवानगी बंधनकारक करणे हे एक प्रकारे संबंधितांना वाचविण्यासारखेच आहे, त्यामुळेच ते टाळले पाहिजे. ज्यांच्या कुटुंबामध्ये पालकांनी अशा पद्धतीने संपत्ती कमावली आहे, त्यांच्या मुलांनी तशा संपत्तीचा त्याग केला पाहिजे, असेसुद्धा न्या. नागरत्ना निकालपत्रात म्हणतात.

पैसा सगळ्यांनाच हवा आहे. कष्ट करून कमावलेल्या पैशांना कोणीच विरोध करण्याचे कारण नाही. पण भ्रष्टाचाराच्या माध्यमातून मिळवलेल्या संपत्तीवर आसूड ओढलेच गेले पाहिजेत. जोपर्यंत अशी संपत्ती मोठ्या प्रमाणात जप्त केली जात नाही, तोपर्यंत वाममार्गाने पैसा कमाविर्णायांवर जरब बसवता येणार नाही. देशातील कायद्याबद्दल, त्यातील तरतुदींबद्दल आणि त्याच्या अंमलबजावणीबद्दल भीती प्रत्येकामध्ये असलीच पाहिजे, मग तो कितीही उच्च पदावर असला तरी हरकत नाही. ही भीती निर्माण करण्यात कलम १७ ए अडथळा आहे, हेच न्या. नागरत्ना यांनी आपल्या निकालामधून स्पष्टपणे दाखवून दिले. दोन न्यायाधीशांच्या स्वतंत्र विचारांमुळे हे कलम अजून रद्द झालेले नाही. पण ते रद्द होणेच सर्वांच्या हिताचे आहे, एवढे नक्की.

# पेरूचे आरोग्यदायी सरबत

**साहित्य :** एक पिकलेला पेरू, दोन चमचे साखर (चवीनुसार), अर्धा इंच अद्रकाचा (आलं) तुकडा, चवीनुसार मीठ, अर्धा चमचा लिंबाचा रस, एक ते दीड कप पाणी थंड पाणी

**कृती :** पिकलेला पेरू धुवून त्याची साल काढावी. पेरूच्या फोडी करून घ्याव्यात. यानंतर या फोडी मिक्सरच्या भांड्यात टाकाव्यात. सोबत अद्रक, मीठ, लिंबाचा रस व एक कप थंड पाणी टाकून मिक्सर फिरवावे. हे सर्व मिश्रण गाळून घ्यावे... तुमच्यासाठी ताजे थंडगार सरबत तयार..



# सुंदर लिप्ससाठी टिप्स !

**आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.**

**तुम्हाला** तुमचे आकर्षण कायम ठेवायचे असेल तर सर्वप्रथम तुम्हाला तुमच्या ओठांकडे लक्ष्य देण्याची गरज आहे. आज प्रत्येक महिला लिपस्टिकचा वापर करत आहे. त्या आपल्या संपूर्ण जीवनकालात किमान ५ किलो लिपस्टिक पोटात टाकतात पण त्याचा आरोग्यावर काही विपरित प्रभाव पडत नाही असे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. लिप्सला जर हॉट बनवायचे असेल तर खाली दिलेल्या टिप्सचा वापर करावा.

▮रोज ५ ते ६ ग्लास पाणी प्यायला पाहिजे. पाण्यामुळे फक्त शरीराला लागणारी पाण्याचीच पूर्ती पूर्ण होत नाही तर ओठांची नमी कायम राहते.

▮बऱ्याच लोकांना ओठांना चावायची सवय असते ती बदलायला पाहिजे. दीर्घ काळापर्यंत लिपस्टिकची चमक कायम ठेवण्यासाठी लिपस्टिक लावल्यानंतर टिशू पेपरने एक्स्ट्रा लिपस्टिक काढून घ्यावी. यामुळे लिपस्टिकची चमक पूर्ण दिवसभर कायम राहते.

▮डार्क कलरचे लिपस्टिक लिप्सला स्मॉल लूक देतात. जर तुमच्या ओठांचा आकार लहान असेल आणि त्याला मोठा लूक द्यायचा असेल तर नॅचरल कलरचे लिपस्टिक वापरायला पाहिजे.

▮जर ओठ जाड असतील तर कन्शिलर आणि फाऊंडेशनच्या मदतीने लिप्सला पातळ शेप देऊ शकता. लिप लायनरने आऊट लाइन ड्रॉ करावी आणि डार्क कलरचे लिपस्टिक त्यात भरायला पाहिजे.

▮जर लिप्सला हॉट लूक द्यायचा असेल तर स्ट्राबेरी आणि चेरी शेड्सचा लिपस्टिकसुद्धा लावू शकता.

▮ बदलत्या मोसमाचा सर्वात जास्त प्रभाव ओठांवर पडतो. म्हणून नेहमी चांगल्या कंपनीचे लिप बाम दिवसातून दोन-तीन वेळा लावायला पाहिजे.





# उन्हाळ्यात सोडा, पॅक्ड ज्यूस वगळून केवळ प्या पाणी

**वजन कमी होतं**

हल्लीच्या लाइफस्टाइलमध्ये सगळे वाढत असलेल्या वजनामुळे परेशान असतात. अशात वजन कमी करण्यासाठी शुगर असलेले पेय पदार्थ न पिता केवळ पाणी पिणे योग्य ठरेल. याने अधिक प्रमाणात कॅलरी बर्न होण्यात मदत मिळेल.

**चयापचय क्षमता वाढेल**

केवळ पाणी पिण्याने आपली चयापचय क्षमता वाढेल आणि यामुळे ऊर्जेचे स्तरदेखील. म्हणून दिवसभर खूप पाणी प्या. या व्यतिरिक्त अधिकाधिक पाणी पिण्याने आपल्याला ध्यान केंद्रित करण्यात देखील मदत मिळेल.

**खाण्यावर नियंत्रण**

आपली डाएट घेल्यानंतरही आपल्याला भूक जाणवत असेल तर केवळ एक ग्लास पाणी प्यावे. याने वजन नियंत्रित करण्यात मदत मिळेल. अनावश्यक कॅलरीज कमी करण्यासाठी पाणी पीत राहावे.

**विषारी पदार्थ शरीरातून बाहेर काढते**

अधिक पाणी पिण्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. ज्यामुळे त्वचेचे आरोग्य उत्तम राहते आणि वय वाढले तरी तारुण्य टिकून राहते. या व्यतिरिक्त अनेक आजार हाय ब्लड प्रेशर, हृदयासंबंधी आजार आणि अपचन सारखे आजार होण्याचा धोका टळतो.



# खानपानच्या ५ असंगत जोड्या
## सेवन करताना काळजी घ्या

**खाण्या-पिण्याच्या भिन्न वस्तू आरोग्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे फायदा करतात. काही पदार्थ मिसळून खाल्ल्याने फायदा होतो तर काही पदार्थ असे आहेत जे सोबत खाल्ल्याने आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो. तर जाणून घ्या अशा ५ जोड्यांबद्दल, ज्याचे सेवन टाळावे.**

**आंबा आणि काकडी**

उन्हाळ्यात आंबा आणि काकडी दोन्हीचे खूप सेवन केलं जातं, परंतु जेवताना दोन्ही सोबत खाणे आरोग्यासाठी नुकसानदायक ठरतं. आंबा एक फळ आहे तर काकडी भाजी म्हणून दोघांना पचनासाठी वेगवेगळ्या एनजाइम्सची गरज भासते, अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन संबंधी समस्या होऊ शकतात.

**डेअरी प्रॉडक्ट्स आणि पालक**

पालकासह डेअरी प्रॉडक्ट्समध्ये पनीर मिसळून तयार भाजी लोकं चव घेऊन खातात. परंतु डेअरी प्रॉडक्ट्समध्ये कॅल्शियम भरपूर प्रमाणात आढळतं आणि पालकात आढळणारे ऑक्सॅलिक ॲसिड शरीराला कॅल्शियम अवशोषित करण्यापासून थांबवतो. ज्यामुळे हे पदार्थ सोबत खाल्ल्याने फायदा होत नाही.

**दूध आणि डाळी**

अनेक पोषण विशेषज्ञाचे म्हणणे आहे की, दुधाचे पचन पोटाऐवजी छोट्या इन्टेस्टाइनमध्ये होतं आणि डाळीने तयार कोणते हा पदार्थ शरीर वेगळ्याने पचवतो. अशात दोन्ही सोबत खाल्ल्याने पचन क्रियेची गती कमी होते.

**भोजनासह फिजी ड्रिंक्स**

फिजी व कार्बोनेटेड ड्रिंक्समध्ये अती प्रमाणात साखर असते. हे भोजनासह घेतल्याने पचन प्रणाली वाईट रित्या प्रभावित होते. याने पचन क्रियेची गती कमी होते आणि सोबतच गॅस व ब्लॉटिंगसारख्या समस्या उद्भवू लागतात.

**दूध आणि ॲंटीबायोटिक्स**

ॲंटीबायोटिक औषध दुधासोबत घेतल्याने औषधांचा प्रभाव पडत नाही असे मानले जाते.

# बेबी मसाजचे फायदे माहीत आहेत का?

**मुलांच्या** सर्वांगीण विकासासाठी त्यांचा आहार, देखरेख व पोषक वातावरण आदी महत्त्वपूर्ण गोष्टींची काळजी घ्यावी लागते. मात्र याव्यतिरिक्त बाळ तंदुरुस्त राहावे म्हणून बेबी मसाज लाभदायी असतो. मसाजमुळे मुलांची हाडे तंदुरुस्त होतात. शिवाय मुलाच्या बुद्धीलाही चालना मिळत असते. लहान मुलाच्या मसाजचा भारतीय आयुर्वेदातही उल्लेख आढळतो.

**मसाजचे फायदे-**

▮मसाजमुळे मुलाचे वजन वाढण्यास मदत होते.

▮दिवसभरातून किमान एक वेळा मसाज केल्याने मुलाचे स्नायू बळकट होतात.

▮मसाजमुळे मुलामधील एकाग्रता वाढते.

▮ मुलाच्या पोट व पचनक्रियेसंबंधी व्याधी दूर होतात.

▮मसाजमुळे मुले व आई यांच्यात घनिष्टता वाढीस लागते.

▮मसाजमुळे मुलांना शांत झोप लागत असते.

▮मसाजमुळे मुलाचा शारीरिक व मानसिक विकास होत असतो.



# रोज एक फळ खाण्याची सवय लावा

**बऱ्याच काळापासून असे म्हटले जाते की ताजी फळे खाण्याचे फायदे खूप आहेत. यामुळेच सर्वांनी ही वस्तुस्थिती स्वीकारून आपल्या आहारात फळांचा समावेश केला आहे. फळाची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यात अनेक प्रकारची जीवनसत्त्वे, खनिजे आणि आहारातील फायबरसारखे पोषक घटक आढळतात. यामुळे आपले शरीर मजबूत होते. फळे शरीराला चांगल्या प्रकारे कार्य करण्यास मदत करण्यासाठी विविध प्रकारचे पोषक प्रदान करतात. फळांमुळेच शरीराची प्रतिकारशक्ती वाढते आणि आपल्या पेशींना दुरुस्तीची संधी मिळते. जरी असे खूप कमी लोक असतील ज्यांनी दररोज एक फळ खाण्याचा विचार केला असेल. चला जाणून घेऊया रोज एक फळ खाणे आरोग्यासाठी का महत्त्वाचे आहे?**

▸ **रक्तातील साखरेचे नियंत्रण :** सर्व फळांमध्ये नैसर्गिकरित्या साखर असते. त्यात फायबर आणि पोषक घटक देखील असतात. त्यांच्यामुळे रक्तप्रवाहात साखर शोषून घेण्याची क्षमता कमी होते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी झपाट्याने वाढत नाही.

▸ **मानसिक आरोग्य :** फळांमध्ये नैसर्गिकरीत्या काही पोषक घटक असतात, ज्यामुळे आपले मानसिक आरोग्य चांगले राहते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे जामुन, जे मानसिक आरोग्य सुधारणारे फळ म्हणून ओळखले जाते.

▸ **वजन नियंत्रणात ठेवा :** फळांची एक चांगली गोष्ट म्हणजे त्यामध्ये कॅलरीज कमी असतात. त्यात फॅटचे प्रमाणही कमी आढळते, तर फायबर आणि पाण्याचे प्रमाण अधिक असते. यामुळेच आहारात फळांचा समावेश केल्यास वजन नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

▸ **ॲंटिऑक्सिडंट्स :** फळांमध्ये ॲंटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. यामुळे, तुमच्या पेशींना ऑक्सिडेटिव्ह तणावामुळे होणारे नुकसान टाळण्याची संधी मिळते. ॲंटिऑक्सिडंट्स हृदयविकाराचा झटका, कर्करोग आणि न्यूरोडीजनरेटिव्ह विकारांचा धोका देखील कमी करतात.

▸ **पचन सुधारते :** फळे नैसर्गिक एन्झाईम्सने भरलेली असतात. यामुळे तुमची पचनक्रिया चांगली होते. उदाहरणार्थ, अननसातील ब्रोमेलेन आणि पपईतील पपेन हे पचनासाठी चांगले असतात. हे एन्झाइम प्रथिने तोडण्यास मदत करतात.



# ॲसिडिटीवर करा घरगुती उपचार

**अनेक** जणांना ॲसिडिटीचा मोठा त्रास होतो. डोकं दुखणं, मानदुखी, छातीत जळजळ होणे, उलट्या होणे, अर्धशिशी, अस्वस्थ होणे अशा प्रकारचा त्रास होतो. झोप पूर्ण न होणं, जागरण, उपाशी राहाणं, चुकीची जीवनशैली, अवेळी खाणे, झोपेच्या सतत बदलत्या वेळा यामुळे त्रास होत असतो. ॲसिडिटीचा त्रास कमी करण्यासाठी अनेक जण गोळ्या घेतात. परंतु अशा गोळ्यांमुळे काही वेळ बरं वाटतं, परंतु पुन्हा त्याचा त्रास सुरू होतो. सतत गोळ्या घेतल्याने त्याचा शरीरावरही घातक परिणाम होत असतो. परंतु ॲसिडिटीवर घरगुती उपयांनीही काही वेळात आराम मिळू शकतो.

▮सतत ॲसिडिटीचा त्रास होत असणाऱ्यांनी थंड दूध प्यायल्याने पोटात आणि छातीत होणारी जळजळ कमी होते.

▮आल्याचा तुकडा चावून खाल्ल्यानंतर त्यावर गरम पाणी प्यायल्याने फायदा होतो.

▮केळे ॲसिडिटीवर अतिशय नैसर्गिक उपाय आहे. ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास नियमित केळे खाल्ल्याने फायदा होतो.

▮बडिशेप ॲसिडिटी कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. जेवणानंतर बडिशेप खाल्ल्याने ॲसिडिटीचा त्रास होत नाही. बडिशेप चावून किंवा चहा करूनही पिऊ शकतात.

▮आवळा सी विटॅमिनयुक्त असतो. आवळा पोटदुखी, गॅस, ॲसिडिटीमध्ये आराम देतो. आवळा पित्त कमी करत असून केसांचं आणि त्वचेचंही आरोग्य राखतो.


▮ टोमॅटोमध्ये कॅल्शियम, फॉस्फरस आणि विटॅमिन सी असतं. जे शरीरातील जीवाणूंना बाहेर काढतं. टोमॅटो आंबट असलं तरी शरीरात क्षारांचे प्रमाण वाढवतं. टोमॅटोच्या नियमित सेवनाने ॲसिडिटीची समस्या कमी होते.

▮मसाल्यांमधील ओवा अतिशय गुणकारी आहे. ॲसिडिटीवरही ओवा फायदेशीर आहे. ॲसिडिटीचा झाल्यास ओवा आणि जिरं एकत्र भाजून घ्या. हे मिश्रण पाण्यात टाकून थोडी साखर टाकून प्यायल्याने फायदा होतो.

▮गुळात मॅग्नेशियम असतं. मॅग्नेशियम आतड्यांना मजबूत करण्याचं काम करतं. त्यामुळे पचनक्रिया सुरळीत होते. रोज जेवणानंतर गुळ खाल्ल्याने पित्त, ॲसिडिटीचा त्रास कमी होतो.

▮वेलची खाल्ल्याने ॲसिडिटीची समस्या दूर होते. एक ग्लास पाण्यात २ वेलची उकळून पाणी थंड करून प्या. त्यामुळे ॲसिडिटीचा त्रास दूर होतो.

▮तुळशीची पानंही पित्ताच्या, ॲसिडिटीच्या त्रासावर गुणकारी आहेत. पित्ताचा, ॲसिडिटीचा त्रास होत असल्यास तुळशीची काही पानं चावून खा किंवा पानं पाण्यात उकळवून ते पाणी पिण्यानेही फायदा होतो. नियमित तुळशीची पानं खाल्याने पित्ताचा त्रास कायमचा बरा होतो.



# उन्हाळ्यात जीन्स वापरताय, अशी घ्या काळजी...

**उन्हाळ्यात सगळ्यात सोयीस्कर म्हणून तुम्ही जीन्स घालत असाल, तर तुमच्यासाठी एक महत्त्वाची बातमी आहे. उन्हाळ्यात बाहेर निघालं की शरीराची अक्षरशः लाही-लाही होण्यास सुरुवात झाली आहे. अशात जर तुम्ही घट्ट जीन्स वापरत असाल, तर जीन्स वापरताना नक्की काळजी घ्या. उन्हाळ्यात घराबाहेर पडताना जीन्स-टॉप किंवा टी शर्ट आणि गॉगल लावला असा रफटफ पेहराव तुम्ही करत असाल. तर तुमच्यासाठी थोडं महत्त्वाचं...**

**जीन्स** अतिशय घट्ट असेल तर जंतुसंसर्ग होण्याचा धोका असतो. घट्ट जीन्स वापरल्यामुळे त्वचेची जळजळ, त्वचा काळवंडणं, घामोळ्या येणं, खाज सुटणं, काळे चट्टे येणं असे त्रास होऊ शकतात. गेल्या काही दिवसांत घट्ट जीन्समुळे जंतुसंसर्ग झाल्याचं प्रमाण वाढलंय. विशेष म्हणजे खाज कमी करण्यासाठी स्टेरॉईडयुक्त मलम लावलं जातं. त्यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता असते. उन्हाळा असल्यास पातळ, सुती कपडे घालणे योग्य आहे. त्यामुळे शरीरीतील घाम शोषूण घेण्यास मदत होते. जाड कपड्यांचा पेहराव शक्यतो करू नये. त्याचप्रमाणे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही क्रीम वापरू नये, असा सल्ला डॉ. उदय कोपकर, त्वचारोगतज्ज्ञ यांनी दिला आहे.

उन्हाळ्यात प्रामुख्याने अतिनील किरणांमुळे डोळ्यांना त्रास होतो. गॉगल बी २ इतका काळा असणं गरजेचं आहे. यूव्ही-रेजपासून संरक्षण करणाऱ्या कॉण्टॅक्ट लेन्ससुद्धा उपलब्ध आहेत. यंदाच्या उन्हाळ्यात तुमच्या शरीराची काळजी नक्की घ्या.





**शारीरिक विकास आणि तंदुरुस्त राहणे यासाठी जीवनसत्त्वे, खनिजे यांची आवश्यकता असते. या घटकांची कमतरता असल्यास शरीराला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वही शरीरासाठी महत्त्वाचे असते. रोगांपासून बचाव करण्यासाठी ई जीवनसत्त्व गरजेचे असते. त्याची कमतरता भासल्यास केस, डोळे, त्वचा यांच्याशी निगडित अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. ई जीवनसत्त्वाची कमतरता भासल्यास शरीराकडून काही संकेत मिळतात. शरीराच्या या संकेतांकडे वेळीच लक्ष न दिल्यास अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेची कारणे, त्याची लक्षणे आणि कमतरता भरून काढण्यासाठी काय उपाय करावेत ते पाहूया.**

# ‘ई’ जीवनसत्त्वाची कमतरता

**कमी** चरबीयुक्त आहार घेतल्यास शरीराला ‘ई’ जीवनसत्त्वाची कमतरता भासते. ज्या लोकांना आतड्यांशी निगडित आजार आहेत. उदा, क्रोहन आणि पित्त (गॉलब्लाडर) या समस्या भेडसावत असतील त्यांच्यामध्ये ई जीवनसत्त्वाची कमतरता असते.

**लक्षणे :**

**स्नायू कमजोर होतात :** ई जीवनसत्त्वाची कमतरता असल्यास स्नायू कमजोर होतात. ई जीवनसत्त्व आणि सेलेनियमची कमतरता असल्यास मायोपॅथीची समस्या वाढते. मायोपॅथीमध्ये स्नायू सुकायला लागतात ते पसरू लागतात किंवा स्नायूंमध्ये वाकडेपणा येतो. ज्यामुळे शरीराचे अवयव वाकडे होऊ लागतात. चालण्या-फिरण्यात अडचणी निर्माण होतात. लहान मुले आणि ज्येष्ठ व्यक्ती यांना हा आजार होण्याचा धोका अधिक आहे. त्याव्यतिरिक्तही अनेक समस्या निर्माण होतात.

**दृष्टी कमी होणे :** ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे डोळ्यांचा रेटिना आणि डिजनरेशन पातळ होते. त्यामुळे डोळ्यातील आतल्या भागावर त्याचा परिणाम होतो. अनेकदा दृष्टी धुसर होते आणि रात्री काही न दिसण्याची समस्या म्हणजे रातआंधळेपणा येऊ शकतो.

**रक्ताची कमतरता :** अनेकदा शरीरात रक्ताची कमतरता होऊ लागते. हल्ली रक्तपेशी कमी होणे यात नवल राहिलेले नाही. ई जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळेही असे होऊ शकते. त्यामुळे शरीराला योग्य प्रमाणात ऑक्सिजन मिळत नाही आणि व्यक्ती अशक्त होऊ लागते.

**ई जीवनसत्त्वाची कमतरता कशी पूर्ण कराल?**

शाकाहारी लोकांना ई जीवनसत्त्वाची कमतरता पूर्ण करण्यासाठी भाज्या, हिरव्या पालेभाज्या, सुकामेवा, रताळे, सलगम, मोहरी, आंबा, ब्रोकोली, गहू, बीन्स, अव्हाकॅडो इत्यादींचा समावेश आपल्या आहारात करावा.





**फळांमधील केळे आरोग्यासाठी अतिशय गुणकारी ठरते. केळ्यात पोटॅशियम आणि विटॅमिन भरपूर प्रमाणात असतात. त्याशिवाय केळ्यात इतरही अनेक पोषक तत्त्व असतात, जी शरीरासाठी अतिशय गुणकारी असतात. त्यामुळेच कोणत्याही प्रकारचं केळे आपल्या खाण्यात सामील केल्याने फायदे होतात. दररोज केळे खाल्ल्याने हार्ट ॲटॅकची शक्यता मोठ्या प्रमाणात कमी होते. त्याशिवाय केळ्याचे इतरही अनेक फायदे आहेत. आज वर्ल्ड बनाना डे आहे. या विशेष दिवशी जाणून घ्या अति पिकलेल्या केळ्याचे जबरदस्त फायदे.**



# केळी खाण्याचे असेही फायदे

**केळ्याचा** रंग जसजसा काळा पडत जातो, ते अधिक, अति पिकलं जातं असं केळं अनेक जण खराब झालं म्हणून किंवा काळं आणि अतिशय मऊ झालं म्हणून खायला आवडतं नसल्याचं सांगतात. परंतु अति पिकलेलं, मऊ, काळं झालेलं केळं शरीरासाठी अतिशय गुणकारी असतं. या केळ्याच्या दररोज खाण्याने अनेक आजारांपासून दूर राहण्यास मदत होते.

रंगाच्या आधारे केळं पिकलेलं आहे किंवा कच्चं आहे याचा अंदाज लावता येतो. केळ्याचा रंग जर हिरवा असेल तर ते कच्चं केळं म्हणून ओळखलं जातं. अशा केळ्याचा वापर भाजीसाठी केला जातो. त्यानंतर केळ्याचा रंग पिवळा होत जातो. केळं अधिक पिकत गेलं की त्यावर काळे डाग पडायला सुरुवात होते. त्यानंतरही काही दिवसांत केळ्याचं संपूर्ण सालचं काळं पडत. युनायटेड नेशनमधील ‘इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट’ या संस्थेने अति पिकून संपूर्ण साल काळं पडलेल्या केळ्याचे महत्त्व, त्याचे फायदे सांगितले आहेत. अशा केळ्यात ट्रिप्टोफॅन मोठ्या प्रमाणात असतं. त्यामुळे मानसिक ताण, चिंता (Anxiety) कमी होण्यास मदत होते. तसेच या मोठ्या प्रमाणात पोषकद्रव्ये असतात. त्यामुळे अशा केळ्याचा वापर ब्रेड बनवण्यासाठी तसेच मिल्कशेक बनवण्यासाठी केला जाऊ शकतो.


हिरवी साल असलेलं केळं खात असाल तर त्यामुळे रक्तातील साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्यास मदत होते. हे केळं अगदी हळूहळू पचतं. त्यामुळे ब्लड ग्लुकोज कमी प्रमाणात निर्माण होतं. पिकलेलं केळं ॲण्टी-ऑक्सिडेंट म्हणून मानलं जातं. हे केळं मेटबॉलिज्म अर्थात चयापचन क्रियेला मजबूत करण्यात मदत करते. त्यामुळे अनेक आजार होण्याची शक्यता अतिशय कमी होते. हे केळं अगदी सहजतेने पचतं. त्यामुळे अति पिकलेल्या केळ्याचा वापर नाश्त्यामध्ये करणे अतिशय आरोग्यदायी मानले जाते. डॉक्टरांकडूनही सकाळच्या नाश्त्यात केळं खाणं गुणकारी मानले जाते.

केळे बाराही महिने बाजारात मिळणारे फळ आहे. केळ्याचा वापर सौंदर्यासाठीही केला जातो. केळं शक्तिवर्धक आहे. दररोज केळी खाणाऱ्या व्यक्तीला एनिमियाचा धोका नसतो. केळं खाल्याने मूडही चांगला राहतो. थकवा दूर होतो. केळ्यातील प्रोबायोटिक बॅक्टेरिया खाण्यातील कॅल्शियम शोषून घेते. यामुळे हाडेही मजबूत होतात.

# ठाण्यातील वाहतूक कोंडीवर नेमके उपाय काय

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

ठाणे आणि ठाण्यातील त्रासदायक वर्दळ ही कोणतीही नवीन चिंता नाही. ठाण्यातल्या छोट्या रस्त्यांपासून मोठ्या महामार्गांपर्यंत वाहनांचा चक्का जाम कायम असतोच. ठाण्याच्या रस्त्याचे जाळे जरी दूरवर पोहचले असले तरी वाहतूक कोंडीचा प्रश्न अद्यापही सोडवण्यात आलेला नाही आहे. ठाणे घोडबंदर रोड, नितीन जंकशन, कॅडबरी सिग्नल आणि लोकमान्य नगरकडे जाणारे मार्ग नेहमीच वाहतूक कोंडीच्या विळख्यात सापडलेले असते. दिवसेंदिवस निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे ठाणेकर अक्षरशः वैतागले असून ठाण्यात ठिकठिकाणी अपघाताचे प्रमाण वाढताहेत. या पार्श्वभूमीवर भाजपचे आमदार संजय केळकर यांनी वाहतूक पोलिस, प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि महापालिका अधिकाऱ्यांची सोमवारी संयुक्त बैठक घेतली आहे. या बैठीकीदरम्यान वाहतूक कोंडी संदर्भात उपाययोजनांचे नियोजन करण्याचे ठरवले आहे. यात वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्रायोगिक तत्वावर वाहतूक बदल लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ठाणे महापालिका क्षेत्राचे गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात



या सगळ्याचा ताण ठाण्यातील रहदारीवर होत असतो. बेकायदा गाड्यांची पार्किंग, फेरीवाल्यांची गर्दी अशा अनेक स्थितीमुळे नागरिकांना चालायला सुद्धा त्रास होतो. दररोज स्टेशन परिसरात वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. ही समस्या सोडविण्यासाठी भाजपचे आमदार संजय केळकर यांनी वाहतूक पोलिस, प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि महापालिका अधिकाऱ्यांची सोमवारी संयुक्त बैठक घेतली. तीन हात नाका येथील वाहतूक शाखेच्या कार्यालयात ही बैठक पार पडली आहे. वाहतूक नियंत्रण परिपूर्ण व्हावे यासाठी शहरात दोन हजार सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. मात्र वाहतुकीचे योग्य नियोजन करण्यासाठी वाहतूक शाखेचे मनुष्यबळ कमी पडत असेल तर पुढील अधिवेशनात त्याबाबत मागणी करण्यात येईल, असे केळकर यांनी बैठकीत स्पष्ट केले.

लोकसंख्या वाढली आहे.

ठाण्यातील घोडबंदर परिसरात अलीकडे मोठ्या प्रमाणात सोसायटी उभी राहिली असून अजूनही नवीन प्रकल्प उभारणीची कामे सुरू आहेत. ठाणे महापालिकेच्या हद्दीतील दिवा, शीळ फाटा, मुंब्रा भागातही मोठ्या प्रमाणात नागरिकरण झाले आहे. वाढत्या लोकसंख्ये बरोबरच वाहनांच्या संख्येत देखील वाढ झाली आहे. ठाणे स्थानक तसेच घोडबंदर भागासह संपुर्ण शहरात वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. ही समस्या सोडविण्यासाठी विविध प्रकल्पांची उभारणी करण्यात येत आहे. यापैकी काही प्रकल्पांची कामे पूर्ण होत आली आहेत. तर, काही कामे सुरू आहेत असे असले तरी, शहरात वाहतूक कोंडीची समस्या कायम असून ती सोडविण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून नियोजन आखण्यात येणार आहे. ठाण्यातील घोडबंदर, स्टेशन परिसर, वर्तकनगर, मध्यवर्ती ठाणे आदी विभागात वाढती लोकसंख्या आणि वाहने यामुळे नियमित वाहतूक कोंडीला नागरिकांना सामोरे जावे लागते.

वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वाहतुकीत काही बदल करण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर अधिसूचना काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, स्थानक परिसरात वाहतुक शाखेच्या अधिकाऱ्यांबरोबर आरटीओचे अधिकारी देखील उपस्थित असावेत, अशा सूचना केल्या असून नागरिकांनी आणि व्यापाऱ्यांनी देखील वाहतूक कोंडी होणार नाही याकडे लक्ष देण्याची गरज आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केली.ठाणे शहराची वाढती लोकसंख्या आणि वाहनांचा विचार करता घोडबंदर पासून वर्तकनगर आणि स्टेशन परिसरात होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिका, वाहतूक शाखा आणि आरटीओच्या समन्वयातून काही निर्णय घेण्यात आले असून आवश्यक वाहतूक बदलांसाठी लवकरच प्रायोगिक तत्वावर अधिसूचना काढण्यात येणार आहे, अशी माहिती आमदार संजय केळकर यांनी दिली.

# ‘टॉप २०’ थकबाकीदारांना नोटीस

## कर भरा अन्यथा महापालिका करणार मालमत्तेचा लिलाव

■ **मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबई महापालिकेचे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत मालमत्ता कर असून मालमत्ता कर न भरणारे पालिकेच्या रडारवर आले आहेत. वारंवार सूचना देऊनही कर भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या २० बड्या थकबाकीदारांना मालमत्ता जप्त करण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. दरम्यान, नोटीस बजावल्यानंतर कर भरणा करावा अन्यथा जप्त मालमत्तेचा लिलाव करण्यात येईल, असा इशारा पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त आश्विनी जोशी यांनी दिला आहे. निर्धारित कालावधीमध्ये कर भरणा करण्यास टाळटाळ करणाऱ्या तसेच आर्थिक क्षमता असूनही मालमत्ता कर न भरणाऱ्या मोठ्या थकबाकीदारांना महानगरपालिकेकडून कलम २०३ अन्वये जप्तीची नोटीस बजावण्यात आली आहे.

### अशी केली जाते कारवाई

मालमत्ताकर देयके मिळाल्यापासून ९० दिवसांच्या आत मालमत्ता कर जमा करणे आवश्यक आहे. तरीही न भरल्यास टप्पेनिहाय कारवाई सुरू करण्यात येते. अधिकारी प्रत्यक्ष संपर्क आणि संवाद साधून कर भरण्यासाठी पाठपुरावा करतात. तरीही मालमत्ता कर न भरल्यास ड्डिमांड लेटरड्ड पाठवण्यात येते. पुढच्या टप्प्यात २१ दिवसांची अंतिम नोटीस दिली जाते. त्यानंतर मालमत्ता जप्ती, लिलाव कारवाई केली जाते.





**‘टॉप २०’ थकबाकीदार**

- रघुवंशी मिल्स - १४० कोटी ६१ लाख ६८ हजार
- राजहंस असोसिएट्स - ४७ कोटी ०२ लाख ९९ हजार
- आशापदारा डेव्हलपर्स - ४४ कोटी ८७ लाख ८० हजार
- सुमेर बिल्टकॉर्प - ३९ कोटी ३० लाख ४७ हजार
- समीर भोजवानी - ३१ कोटी ७३ लाख २३ हजार
- डीबीएस रिऍल्टी - २९ कोटी १२ लाख २१ हजार
- आमीर पार्कस् ॲंड ऍम्युझमेंट - २७ कोटी ७९ लाख ५५ हजार
- डीबीएस रिऍल्टी - २२ कोटी ४२ लाख ६० हजार
- डीबीएस रिऍल्टी - २२ कोटी ४० लाख ४८ हजार
- एस. डी. कॉपोर्रेशन - २१ कोटी ४३ लाख ४२ हजार
- ए. आर. जाफर - २१ कोटी ३ लाख ३६ हजार
- डीबीएस रिऍल्टी - २० कोटी ५६ लाख ३३ हजार
- डीबीएस रिऍल्टी - २० कोटी ५६ लाख ३० हजार
- डीबीएस रिऍल्टी - २० कोटी ५५ लाख ६२ हजार
- डीबीएस रिऍल्टी - २० कोटी ५४ लाख १८ हजार
- डीबीएस रिऍल्टी - २० कोटी ५४ लाख ०४ हजार
- डीबीएस रिऍल्टी - २० कोटी ५३ लाख ४६ हजार
- गॅलेक्सी कॉपोर्रेशन - २० कोटी २२ लाख ८२ हजार
- डीबीएस रिऍल्टी - १९ कोटी १० लाख ४१ हजार
- डीबीएस रिऍल्टी - १८ कोटी ६७ लाख ६९ हजार

# दैनंदिन बाजार करात वाढ, वसई-विरारमधील फेरीवाल्यांमध्ये नाराजी

■ **वसई। प्रतिनिधी,**

वसई-विरार शहर महानगरपालिकेकडून दैनंदिन बाजार कर वसुलीत वाढ करण्यात आल्याने शहरातील फेरीवर्यांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. वसई-विरार शहरांमध्ये दररोज विविध भागांमध्ये भरणाया बाजारातून पालिकेकडून दैनिक बाजार फी वसूल केली जाते.आधी ही बाजार फी ७१ रुपये होती. आता जी.एस.टी १८ रुपये आकारण्यात येत आहे. त्यामुळे एका दिवसासाठी फेरीवाल्यांना एकूण ८९ रुपये बाजार कर भरावा लागत आहे. त्याचा थेट परिणाम त्यांच्या उत्पन्नावर होत असल्याचे बोलले जात आहे.

वसई विरार महानगरपालिकेकडे अद्याप ठोस फेरीवाला धोरण अस्तित्वात नाही. फेरीवाले झोन, नोंदणी प्रक्रिया, परवाने, स्थिर व अस्थिर फेरीवाले याबाबत स्पष्ट नियम नसल्याने गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. धोरण नसतानाही बाजार करात वाढ करण्यात आल्याने फेरीवाल्यांमध्ये नाराजी पसरली आहे. शहरात भरमसाठ प्रमाणात फेरीवाल्यांची संख्या वाढली असून त्यावर कोणतेही प्रभावी नियंत्रण नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे अधिकृत आणि अनधिकृत फेरीवाल्यांमध्ये फरक करणे कठीण झाले आहे. शहरातील व्यापारी आणि नागरिकांकडूनही वाढत्या फेरीवाल्यांमुळे वाहतूक कोंडी, अतिक्रमण आणि स्वच्छतेचे प्रश्न निर्माण होत असल्याचे सांगितले जात आहे. मात्र यावर उपाय म्हणून सुस्पष्ट फेरीवाला धोरण आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.





एकीकडे पालिकेचा महसूल वाढविण्यासाठी बाजार कर वाढवण्यात येत असताना दुसरीकडे मात्र फेरीवाल्यांच्या नियोजन आणि व्यवस्थापनाबाबत ठोस पावले उचलली जात नसल्याने हा मुद्दा आता चचेर्चा विषय ठरत आहे. वसई विरार शहर महानगरपालिका यापूर्वी फेरीवाल्यांकडून जीएसटी कर आकारत नव्हती त्यामुळेही दैनंदिन बाजार कर रक्कम कमी होती. मात्र सध्या या दैनंदिन बाजार रकमेत जीएसटी लावून रक्कम स्वीकारली जात आहे, अशी माहिती पालिका उपायुक्त अजित मुठे यांनी दिली आहे.

# विद्याविहारमध्ये ३ वर्षांच्या चिमुकल्याला पळवण्याचा प्रयत्न

## रहिवाशांनी चोप देत आरोपी महिलेला केले पोलिसांच्या हवाली

■ **मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईतील विद्याविहार पश्चिम परिसरात मंगळवारी (दि.१०) सकाळी घडलेल्या एका घटनेने तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. शंकरनगर, खालई गाव भागात एका महिलेने तीन वर्षांच्या चिमुकल्या मुलाला उचलून नेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला असून, सतर्क नागरिकांनी तिला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.

### परिसरात भीतीचं वातावरण

प्रत्यक्षदर्शींनुसार, मुलाला उचलून नेण्याचा संशय येताच पालक आणि स्थानिक रहिवाशांनी तात्काळ हस्तक्षेप केला. संतप्त नागरिकांनी संबंधित महिलेला थांबवत तिला मारहाण केली आणि नंतर विद्याविहार पोलिसांच्या ताब्यात दिलं. या घटनेनंतर परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं असून, अनेक पालकांनी मुलांना घराबाहेर खेळायला



पाठवताना अधिक सतर्कता बाळगण्यास सुरुवात केली आहे.

### रॅकेटचा संशय; तपासाची मागणी

काही रहिवाशांनी ही घटना मुलं पळवणाऱ्या टोळीशी संबंधित असू शकते, अशी शंका व्यक्त करत सखोल तपासाची मागणी केली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी महिलेला ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे.

**मुंबईत बेपत्ता मुलांच्या घटनांमुळे चिंता वाढली**

मुंबईत अल्पवयीन मुलांच्या बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये वाढ झालेली असतानाच ही घटना समोर आल्यामुळे पालकांमध्ये भीती आहे. काही दिवसांपूर्वीच (१ फेब्रुवारी) 'फ्री प्रेस जर्नल'ने, केवळ ३६ तासांत मुंबईतून १२ मुले बेपत्ता (८ मुली) झाल्याचे वृत्त दिले होते.

# नैराश्यातून तरुणाची आत्महत्या

■ **भाईंदर। प्रतिनिधी,**

डोळ्यांची दृष्टी कमी झाल्याच्या विवंचनेतून एका २७ वर्षीय तरुणाने गळफास लावून आत्महत्या केल्याची दुदैर्वी घटना भाईंदरमध्ये घडली आहे. कार्तिक रवींद्र शेट्टी असे मृत तरुणाचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. भाईंदरमध्ये शनिवारी ७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ ते ७ च्या सुमारास ही घटना घडली. कार्तिक याला गेल्या काही दिवसांपासून डोळ्यांनी कमी दिसत होते. या शारीरिक व्याधीमुळे तो प्रचंड मानसिक दडपणाखाली होता. याच नैराश्यातून त्याने राहत्या घरातील हॉलमध्ये असलेल्या सिलिंग फॅनला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आपले जीवन संपवले आहे. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी त्याला तातडीने उपचारासाठी भाईंदर (पश्चिम) येथील पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात दाखल केले. मात्र, रुग्णालयातील कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांनी त्याला तपासून दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित केले. या प्रकरणी नवघर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तनपुरे अधिक तपास करत आहेत. मयत कार्तिकच्या वडिलांनी दिलेल्या जबाबानुसार, मुलाने दृष्टी कमी झाल्याच्या नैराश्यातूनच हे टोकाचे पाऊल उचलले असून, याप्रकरणी त्यांची कोणा विरोधात तक्रार किंवा संशय नाही. पोलिसांनी या घटनेची नोंद केली असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

# ठाण्यातल्या कंत्राटदार, आणि बिल्डरसह जमीन मालकांवर सुद्धा गुन्हा दाखल

■ **ठाणे। प्रतिनिधी,**

ठाणे शहरात काळानुसार भरपूर बदलत सहज होत आहेत. ठाण्यातील भरपूर विकास कामांना अलीकडे जोर आला असून बिल्डिंग आणि विविध प्रकल्प दिवसेंदिवस ठाण्यात वाढताहेत. विकासाच्या नावाखाली जरी ठाणे बदलत असलेतरी, ठाण्यातल्या मातीची अवैध पद्धतीने काही कंत्राटदारांकडून व्यवसाय केला जात असते. मात्र या कंत्राटदारांवर अथवा बिल्डर लॉबीवरती कोणतीही कारवाई केली जात नसायची. तसेच गेल्या काही काळापासून ठाण्यातल्या काही भागातून कंत्राटदार आणि बिल्डर लॉबी ठाण्यातील माती, खनिज अनाधिकृतपणे वापरत करत आहेत. ठाण्याच्या रियल इस्टेट इंडस्ट्रीला चालना देण्यासाठी कंत्राटदार आणि बिल्डर यांची मुजोरी गेल्या काही महिन्यापासून पाहायला मिळाली आहे. या चिंताजनक परिस्थिती काही ठाण्यातल्या स्थानिक संस्थेच्या आणि नागरिकांच्या निरदर्शनस आले होते. दरम्यान या संदर्भात काही ठाणेकरांनी नियमित होणाऱ्या बेकायदा खनिज चोरीची तक्रार ठाणे तहसीलदार कार्यालयात केली आहे. तसेच अनधिकृत गौण खनिज उत्खनन आणि वाहतूक केल्याप्रकरणी १०८ बिल्डर, कंत्राटदार, मालक यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. गुन्हे दाखल करण्याचे थेट आदेश ठाणे तहसीलदार तलाठी, उमेश पाटील यांनी मंडळाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. दरम्यान यासंबंधीचा अहवाल ९ फेब्रुवारीपर्यंत सादर करण्याच्या सूचनाही सुद्धा देण्यात आले आहे. ठाण्यात १०८ बिल्डर, कंत्राटदारांवर एकच खळबळ उडाली असून ठाण्यातील अनधिकृत





गौण खजिनाचा घोटाळा देखील उघडकीस झाला आहे.

ठाणे शहरासह ठाण्यातील इतर तालुक्यांमध्ये सुद्धा अनेक ठिकाणी नवीन इमारतींचे कामे सुरू आहेत. इमारतींच्या आणि इतर प्रकपलांतर्गत वापरण्यात येणारी माती अवैध पद्धतीने वापरली जात असते. वाळू, माती वापरण्यासाठी त्याप्रकारची काही अधिकृत प्रक्रिया असते. मात्र या कंत्राटदारांकडून नियमांना धाब्यावर बसवले जाते. वाळू, गौण खनिज, माती अजून इतर अधिकृत परवानगी घ्यावी लागते व सरळ पद्धतीने पार पाडले जाऊ शकते. मात्र कर भरायला होईल म्हणून अनधिकृत गौण खनिज उत्खनन, मोठ्या लॉरी व डंपरच्या साहयाने वाहतूक केले जात असते. त्यामुळे ठाणे तहसीलदार पाटील यांनी सबंधित अनधिकृतपणे खनिज उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्या १०८ कंत्राटदार, जमीन मालक तसेच कब्जेदार यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल केले आहे.

या गौण खनिज, माती वाळूची चोरी ही ठाण्यातील संकेत, बाळकुम, बेलापूर, मुंब्रा, दिवा आणि दहिसर अशा गावांमधून मोठ्या प्रमाणात होत असल्याची माहिती आहे. या अगोदर वारंवार जमीन मालकांना संदर्भात सूचना देऊन देखील जमीन मालक अधिकृतपणे व्यवसाय करत नाहीत. तसेच माती, खनिज आपल्या मालकीची असल्याप्रमाणे सरकारी त्रुटी न जुमानता अवैध व्यवसाय करत असतात. त्या उत्खलनाच्या अनुषंगाने शासनाची दंडनीय रक्कम भरत नाहीत, नेहमीच टाळाटाळ करीत असतात. वारंवार त्यांना संधी देऊन देखील त्यांनी शासनाची दंडणीय रक्कम भरलेली नाही अशी माहिती तहसीलच्या अधिकाऱ्यांकडून मिळाली आहे. त्याचप्रमाणे खनिज उत्खनन करण्यासाठी कोणतीही सक्षम न्यायालयाचा आदेश देखील आणलेला नाही. आता सदर कसूरदारांची मालमत्ता जप्त करून लिलाव करण्याची कार्यवाही देखील चालू करण्यात आलेली आहे. तसेच संबंधितांवरती फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येत आहे. फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कारवाई आजच चालू होईल अशी माहिती तहसीलदार उमेश पाटील यांनी दिलेली आहे.

## ‘मान्य करा, चोर आहात...’ मुख्याध्यापकाची विद्यार्थ्यांना धमकी

# विद्यार्थी रडत-रडत पोहोचले पोलिस स्टेशनमध्ये

**पोलिसांनी केली तडजोड**

पोलीस ठाण्यात पोहोचलेल्या या रडणाऱ्या मुलांनी आपली व्यथा मांडली, तेव्हा तिथे उपस्थित असलेल्यांच्या डोळ्यांतही पाणी आले. मात्र, या गंभीर प्रकरणात पोलिसांची भूमिका अत्यंत उदासीन आणि वादग्रस्त ठरली आहे. मुलांच्या मानसिक स्थितीचा विचार करून मुख्याध्यापकांवर कडक कारवाई करण्याऐवजी, पोलिसांनी हा एक सामान्य वाद असल्याचे मानले. पोलिसांनी मुख्याध्यापकांना ठाण्यात बोलावून घेतले आणि दोन्ही बाजूंमध्ये केवळ 'तडजोड' घडवून आणत प्रकरणावर पडदा टाकला. कोणत्याही ठोस चौकशीविना किंवा मुलांच्या भविष्याची खात्री न घेता त्यांना पुन्हा त्याच वातावरणात परत पाठवण्यात आले.

■ **मुंबई । प्रतिनिधी,**

मुलांना शाळेत खोटं बोलू नये, प्रामाणिकपणा हे जगण्यातील महत्त्वपूर्ण मूल्य आहे अशा अनेक गोष्टी शिकवल्या जातात. पण शाळेतील शिक्षकच या विरोधात वागत असतील तर? अशीच ही घटना आहे. एका मुख्याध्यापकाने शाळेतील विद्यार्थ्यांवरच चोरीचे खोटे आरोप केले. त्यांनी चोरी केली नसल्याचं खूपदा सांगितलं, पण तो मुख्याध्यापक ऐकायलाच तयार नव्हता. शेवटी ते विद्यार्थी पोलिस स्टेशनला पोहोचले. पण तिथंही त्यांची दाद घेण्यात आली नाही, यानंतर पुढं काय घडलं, जाणून घेऊया. छत्तीसगडच्या सूरजपूर जिल्ह्यातील करंजवार पूर्व माध्यमिक शाळेतील ही घटना आहे.

### गुन्हा मान्य करा अन्यथा...

२६ जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमासाठी एक छोटा स्पीकर शाळेत आणण्यात आला. मात्र तो अचानक गहाळ झाला. या घटनेनंतर शाळेचे मुख्याध्यापक राजेश प्रसाद यादव यांनी कोणताही पुरावा नसताना या निष्पाप मुलांवर चोरीचा संशय व्यक्त केला आणि त्यांना गुन्हेगारांसारखी वागणूक देत मानसिकदृष्ट्या छळण्यास सुरुवात केली. मुख्याध्यापकांनी मुलांवर चोरीची कबुली देण्यासाठी



प्रचंड दबाव टाकला आणि त्यांना धमकी दिली की, जर त्यांनी गुन्हा मान्य केला नाही तर त्यांचे ट्रान्सफर सर्टिफिकेट कापून त्यांना शाळेतून काढून टाकले जाईल. इतकेच नव्हे तर, या विद्यार्थ्यांना परिसरातील इतर कोणत्याही शाळेत प्रवेश मिळणार नाही, अशी भीतीही त्यांना घालण्यात आली. मुख्याध्यापकांच्या या धमक्यांमुळे मुलांचे भविष्य टांगणीला लागले आणि ती प्रचंड मानसिक तणावाखाली आली. शाळेत शिक्षकांची दहशत आणि घरी पालकांची समज यामुळे हतबल झालेल्या या मुलांनी अखेर रडत रडत पायी चालत प्रतापपूर पोलीस ठाण्याची पायरी चढली. याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे.

# लोखंडी सळ्या चोरल्याच्या संशयावरून ५ किशोरवयीन मुलांना डांबलं

■ **मुंबई । प्रतिनिधी,**

बांधकाम सुरु असलेल्या इमारतीतून लोखंडी रॉड चोरल्याच्या संशयावरून पाच अल्पवयीन मुलांना ओलीस ठेवण्यात आले. आरोपी हे घटनास्थळापासून काही अंतरावरील पेइंग गेस्ट म्हणून राहत होते. याच अल्पवयीन मुलांना क्रूरपणे मारहाण केली नंतर त्यांच्या गुप्तांगावर पेट्रोल ओतले होते. या घटनेनं परिसर हादरून गेला. ही घटना गुरुग्रामच्या नथुपूरमच्या यू-ब्लॉकमध्ये डीएलएफ फेज ३ पोलीस ठाणे हद्दीत घटना घडली.

### मुलांना गरम चमच्यांने चटके दिले

एवढंच नाहीतर गरम चमच्यांने त्यांना चटके देखील देण्यात आले होते. आपल्या मुलाला शोधत असलेली एक महिला आरोपींकडे आली. नंतर त्या महिलेला देखील शिवीगाळ





आरोपींनी तिला बेदम मारहाण करण्याची धमकी दिली. जेव्हा ती महिला अल्पवयीन मुलांना घरी घेऊन आली तेव्हा त्यांनी त्यांच्यावर झालेल्या अत्याचाराचा घटनाक्रम सांगितला. अल्पवयीन मुलांनी सांगितलं की, आरोपींनी त्यांना बेदम मारहाण केली, नंतर दारूच्या नशेत त्यांनी त्यांच्या गुप्तांगात पेट्रोल ओतले आणि गरम चमच्याने चमचे दिले.

करण्यात आली आणि नंतर जीवे मारहाण करण्याची धमकी देखील दिली. बराच वेळ विनंती केल्यानंतर अखेर अल्पवयीन मुलांना सोडले. महिलेनं केलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी बुधवारी दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत.

महिलेनं बिहारच्या डीएलएफ फेज ३ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीत त्यांनी म्हटलं की, ती नाथुपूर येथील भाडेतत्त्वाच्या घरात राहते आणि एका शाळेत काम करते. सोमवारी ती कामावर गेली असता, ती दुपारी पुन्हा घरी परतली होती, तेव्हा तिचा १२ वर्षांचा मुलगा बेपत्ता झाला होता. बेपत्ता मुलाचा शोध घेण्यास सुरुवात केली असता, महिलेनं सांगितलं की, तिचे दोन्ही मुलं बेपत्ता आहेत.

### आईच्या विनंतीनंतर मुलाला सोडलं

अल्पवयीन मुलांचा शोध घेताना, तिला कळले की, मुलांना यू ब्लॉकमधील दीपकच्या पीजीमध्ये ठेवण्यात आले होते. ती तिच्या मुलाला शोधत दीपकच्या पेइंग गेस्ट असलेल्या घरी गेली. तिथे तिचा मुलगा आणि इतर चार अल्पवयीन मुले एका खोलीत आढळून आले. तिच्या लक्षात आले की, खोलीत पाच ते सहा लोक उपस्थित होते आणि त्यांनी सर्व अल्पवयीन मुलांना ओलीस ठेवले होते. आरोपीने महिलेवर अत्याचार केला आणि तिलाही तिथेच बसवले. महिलेनं हात जोडून पदर पसरल्यानंतर तिला आणि अल्पवयीन मुलांना सोडवण्यात आले.

दरम्यान आरोपी हरेंद्र लोहिया, फिरोज खान, मोहम्मद जिमौल, दीपक, प्रदीप आणि सचिन यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी हरेंद्र आणि फिरोज खान दोघांना अटक केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com